मंगळवार, ३१ ऑक्टोबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ८५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 31 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-85 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

# मराठा आंदोलनाला हिंसक वळण

## राज्यात खळबळ : आमदार प्रकाश सोळंकेंचा बंगला जाळला



आधुनिक केसरी न्यूज

**बीड : माजलगावमध्ये आक्रमक मराठा आंदोलकांकडून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या घरावर सोमवारी दगडफेक करण्यात आली. तसेच, सोळंकेंच्या बंगल्याच्या आवारात उभ्या असलेल्या गाड्याही आंदोलकांनी जाळल्या. प्रकाश सोळंकेंनी मनोज जरांगे पाटील यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यामुळे मराठा आंदोलक आक्रमक झाले आणि याच्याच निषेधार्थ आ. प्रकाश सोळंकेंच्या घरावर आंदोलकांनी दगडफेक करीत जाळपोळ केली.**

**मी मराठा समाजाचाच आमदार, आरक्षणाला माझा पूर्ण पाठिंबा : आमदार प्रकाश सोळंके**
आमदार प्रकाश सोळंके बोलताना म्हणाले की, मी माजलगावमध्येच आहे. मी घरातच आहे. आज सकाळी अचानक काही आंदोलक माझ्या घरी आहे. माझ्या घरावर मोठ्या प्रमाणात दगडफेक केली. घराचं, ऑफिसचं आणि गाड्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान केले. आपल्या माध्यमातून मी सर्व आंदोलकांना विनंती करणार आहे की, मी मराठा समाजाचाच आमदार आहे आणि माझाही मराठा आरक्षणाला पाठिंबा आहे. आरक्षण मिळावं अशी माझीही मागणी आहे. काही राजकीय विरोधक असतात जे काही बाबतीत चिथावणी करु शकतात. माझा कोणत्याही आंदोलकांवर राग नाही, मी त्यांच्या भावना समजू शकतो की, त्यांच्या भावना तीव्र आहेत. त्यामुळे अशा बाबतीत राजकीय विरोधक संधी घेतात, असाच प्रकार याबाबतीत झाला असल्याचे मला वाटते.

**मला आंदोलकांशी बोलण्याची संधीच मिळाली नाही, थेट घरावर दगडफेक सुरू झाली :**
मला आंदोलकांशी बोलण्याची संधीच मिळाली नाही. माझ्या घरावर थेट दगडफेक करायला सुरुवात केली. कोणी काही बोलण्याच्या मनस्थितीतच नव्हते. माझ्या घराला चारही बाजूंनी वेढा दिला. त्यामुळे चर्चा करण्याचा प्रश्नच आला नाही. मी पुन्हा एकदा तुमच्या माध्यमातून विनंती करतो की, माझाही मराठा आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा आहे. मीसुद्धा मराठा समाजाचाच आमदार आहे. काहीजण अर्धवट क्लिप काढून गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न करत आहेत. हेच माझ्याबाबतीत घडले आहे. सर्व आंदोलकांना माझी हात जोडून विनंती आहे, यांच्याच प्रेमाच्या जोरावर मी आमदार झालो आहेत. माझा मराठा समाजाच्या मागणीला पूर्ण पाठिंबा आहे, असे प्रकाश सोळंके म्हणाले.

**शाळेत न जाण्याचा चिमुकल्या विद्यार्थ्यांचा निर्णय :** मनोज जरांगे-पाटील यांच्या आरपारच्या आंदोलनाचे पडसाद बुलढाणा जिल्ह्यातही उमटत आहे. संग्रामपूर तालुक्यातील धामणगाव गोतमारे येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी, जोपर्यंत मराठा आरक्षण मिळत नाही तोपर्यंत शाळेत न जाण्याचा निर्णय घेतला आहे, तर ग्रामस्थांनी हातात लाठ्याकाठ्या घेऊन नेत्यांना गावबंदी जाहीर केली आहे. मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा म्हणून आता बुलढाणा जिल्ह्यातही मराठा समाज आक्रमक झाला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील राहेरी, ताड शिवणी ( सिंदखेडराजा) या गावांनी नेत्यांना गावबंदी लागू केली. तरवाडी ( नांदुरा) ग्रामपंचायतीने तसा ठरावच पारित केला आहे. आज, सोमवारी संग्रामपूर तालुक्यातील धामणगाव गोतमारे या गावातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी जोपर्यंत आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत शाळेत जाणार नाही, असा निर्णय जाहीर केला. विद्यार्थ्यांच्या या निर्णयाला त्यांच्या पालकांचाही पाठिंबा आहे. दुसरीकडे, राजकीय नेते व लोकप्रतिनिधींना गावबंदी करण्यात आली आहे. ग्रामस्थांनी गावाच्या वेशीवर लाठ्याकाठ्या घेऊन राजकीय नेत्यांना गावात येऊ नका, असे ठणकावून सांगितले.

मराठा आरक्षणाचा मुद्दा तापला असून, याचे पडसाद वेगवेगळ्या ठिकाणी उमटताना पाहायला मिळत आहे. मराठा आरक्षणासाठी हिंगोली लोकसभा मतदार संघाचे खासदार हेमंत पाटील यांनी राजीनामा दिल्यानंतर राजीनामा सत्र सुरू झाले आहे. आता माढा तालुक्यातील रांझणी भिमानगर ग्रामपंचायत सरपंच चंचला विजय पाटील यांचा मराठा आरक्षणासाठी सरपंच पदाचा राजीनामा दिला आहे. राजीनामा देणाऱ्या महाराष्ट्रातील त्या पहिल्या महिला सरपंच आहेत.

परभणीच्या मानवत तालुक्यातील मानोली येथे तहसीलदारांची गाडी फोडल्याचा प्रकार समोर आला आहे. मानोलीमध्ये गावातील पाण्याच्या टाकीवर चढून मराठा आरक्षणासाठी गावकऱ्यांनी आंदोलन सुरू केले आहे. यावेळी या आंदोलनकर्त्यांना भेटण्यासाठी मानवतचे तहसीलदार रणजितसिंह कोळेकर हे गेले होते. यावेळी निवेदन स्वीकारण्यासाठी टाकीवर जाण्याची विनंती गावकऱ्यांनी केली. मात्र, यासाठी त्यांनी नकार दिल्याने काही तरुण आक्रमक झाले. या तरुणांनी तहसीलदारांची गाडी फोडली आहे. या प्रकारानंतर गावामध्ये पाथरीचे उपविभागीय पोलीस अधिकारी शैलेश लाहोटी तसेच पोलीस पथक दाखल झाले. सध्या घटनास्थळी तणावाचे वातावरण असून, पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

जालना जिल्ह्यातील रामनगर येथे तहसीलदाराच्या गाडीची तोडफोड केल्याची घटना घडली आहे. जालना तालुक्यातील बाजीउम्रद गावात मोबाईल टॉवरवर चढलेल्या आंदोलकांनी सरकारचे प्रतिनिधी म्हणून तहसीलदार यांनी चर्चेसाठी येण्याची मागणी होती. आंदोलनास्थळा जवळून जाणाऱ्या तहसीलदारांची गाडी आडवून त्यांच्या गाडीवर दगडफेक करण्यात आली. तर दुसऱ्या घटनेत बीडच्या आष्टीत तहसीलदारांची गाडी पेटवून देण्यात आली आहे. आष्टीचे तहसीलदार प्रमोद गायकवाड यांची घराच्या आवारात उभी असलेली शासकीय गाडी मध्यरात्रीच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने पेटवून दिली आहे. या आगीमध्ये तहसीलदारांच्या गाडीचे संपूर्णपणे नुकसान झाले आहे. यासोबतच मानवत तालुक्यातील मानोली येथे तहसीलदारांची गाडी फोडल्याचा प्रकार समोर आला आहे.

**मराठवाड्यातील बस सेवा विस्कळीत...**



मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठवाड्यात ठिकठिकाणी आंदोलन सुईरू असून, याचे परिणाम बस सेवेवर होतांना दिसत आहे. काही ठिकाणी बसवर दगडफेक करण्यात आल्याने या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील बस सेवा बंद करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरसह विभागातील सर्वच जिल्ह्यातील बस सेवा बंद आहे.



### नाशिक - छत्रपती संभाजीनगर रस्ता रोखला

मनोज जरांगे यांना समर्थन म्हणून भरवसफाटा येथे अमित मुदगुल उपोषणाला बसले आहेत. त्यामुळे जरांगे पाटील व मुदगुल यांना पाठिंबा देण्यासाठी निफाड पूर्व भागातील ४६ गावातील ग्रामस्थांनी तब्बल तीन तास नाशिक - छत्रपती संभाजीनगर महामार्ग रोखला.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, तसेच शासन मराठा आरक्षणाबाबत दिरंगाई करत आहे, न्यायालयीन पुर्तता करत नाही, मराठा सामाजाच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून मराठा समाजाच्या भावनांशी खेळत आहे. त्यामुळे निफाड तालुक्यातील नागरिकांनी एकत्र येत नाशिक छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील भरवसफाटा येथे चक्काजाम आंदोलन केले. यासाठी भरवसफाटा बंदची हाक देण्यात आली होती. त्यामुळे बंदला अपेक्षित प्रतिसाद मिळाला. यावेळी 'जय जिजाऊ जय शिवराय, तसेच 'एक मराठा लाख मराठा' व 'मनोज जरांगे पाटील तुम आगे बडो हम तुम्हारे साथ हे' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. मंत्री छगन भुजबळ तसेच राजकीय नेत्यांच्या विरोधात आक्षेपार्ह घोषणा देण्यात आल्या. यावरून मराठा समाजाचा आक्रोश दिसून आला. या आंदोलनात परिसरातील गोदेगाव, मरळगोई, गोळेगाव, दहेगाव, वाहेगाव, भरवस, मानोरी, वाकद, शिरवाडे, लासलगाव, विंचूर व परिसरातील तरूण व नागरिकांनी व शालेत विद्यार्थ्यांनीनी सहभाग नोंदवला. महिलांचाही समावेश जास्त प्रमाणात पाहायला मिळाला. चक्का जाम मुळे नाशिक - छत्रपती संभाजी नगर महामार्गावर तब्बल तीन तास वाहतुक कोंडी झाली होती. आंदोलनात सहभागी महिला व शालेय विद्यार्थिनींनी प्रशासन नायब तहसीलदार दिपाली खेडेकर यांना निवेदन दिले. याप्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी पालवे, स.पो.नि.राहुल वाघ यांच्या नेतृत्वाखाली मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला होता. याप्रसंगी डॉ.सुजित गुंजाळ, शिवा सुरासे, निवृती जगताप, ललित दरेकर, डॉ. श्रीकांत आवारे, प्रशांत भोसले, बापू भोसले, प्रवीण नाईक, विक्रम भोसले, बापू डुंबरे, महेश मेथे, वाल्मिक मूदगूल, तात्या वावधाने, योगेश काळे, बन्शी जाधव, पंडित मुदगुल, पंकज गिते, भाऊ जाधव, भागवत बोचरे, शांताराम जाधव, अंकुश तासकर, बाबासाहेब चिताळकर आदींसह परिसरातील मराठा समाज बांधव उपस्थित होते.

**शांतता राखावी :** सुप्रीम कोर्टात टिकणारे आरक्षण आणि कुणबी दाखले शोधणे अशा दोन पातळीवर सरकारचे काम सुरु आहे. मराठा आंदोलकांनी कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नये, शांतता राखावी, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.



सध्या मराठा आंदोलन भरकटत चालले आहे, दुसऱ्या दिशेला चालले आहे. याचा विचार मनोज जरांगे पाटील आणि त्यांची टीम, तसेच सकल मराठा समाजाने करणे गरजेचे आहे. या आंदोलनामध्ये मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या प्रक्रियेमध्ये जे नेते आहेत, त्यांना सुद्धा विचार करण्याची वेळ आहे हे आंदोलक हिंसक का होत आहे, याच्या मागे कोण आहे, ज्या आत्महत्या होत आहेत त्या का होत आहेत? याचा विचार मराठा समाजातील नेत्यांनी करायला हवा. जे नेते मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, अशा भावनेतून काम करत आहेत, त्यांना गावबंदी करुन, आपआपसात मतभेद होऊ लागले, संघर्ष होऊ लागला तर गालबोट लागेल. मराठा समाजाबाबत सहानुभूती आहे, शिस्तीची परंपरा आहे, देशाने शिस्त पाहिली, त्याला गालबोट लागेल. मराठा समाजाबाबत जी सहानुभूती आहे ती कमी होईल, त्यामुळे मराठा आंदोलन यापूर्वी शांततेने झाली त्याला आता गालबोट कोण लावतय याचा विचार आंदोलनकर्त्यांनी केला पाहिजे, असे मुख्यमंत्री म्हणाले.



**मराठा आरक्षणासाठी राज्यभरात आंदोलन आणि उपोषण सुरु आहे. तर, आता आरक्षणासाठी एका दिव्यांग तरुणाने थेट कळसुबाई शिखरावर उपोषण सुरु केले आहे.**

मराठा समाजाच्या उपसमितीच्या बैठकीला दोन्ही उपमुख्यमंत्री गैरहजर होते. तसेच बैठकीनंतर एकटे एकनाथ शिंदे हे पत्रकारांना सामोरे गेले. एरवी लहान-मोठ्या पत्रकार परिषदांना तिन्ही प्रमुख नेते (मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री) उपस्थित असतात. परंतु, यावेळी दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे वेगवेगळ्या चर्चांना उधाण आलं आहे. माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते अशोक चव्हाण यांनी यावरून राज्य सरकारला टोला लगावला आहे. अशोक चव्हाण म्हणाले, आजच्या बैठकीला आणि पत्रकार परिषदेला दोन्ही उपमुख्यमंत्री अनुपस्थित होते. उपमुख्यमंत्र्यांनी किमान दाखवले तरी पाहिजे की आम्ही या विषयावर सरकारबरोबर आहोत. त्यांच्यात अंतर्गत काही विषय असतील तर ते त्यांनाच माहिती. परंतु, हा विषय राजकारण करण्याचा नाही. मराठा समाजाला राजकारणाचा कंटाळा आला आहे. कोणीतरी यातून मार्ग काढेल याची समाज वाट पाहतोय. एक जबाबदार विरोधी पक्ष म्हणून, महाविकास आघाडीचा सदस्य म्हणून हा प्रश्न मार्गी लावावा यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.



### तलवाडा येथील नागरिक ट्रॅक्टर रॅली काढत उपोषणस्थळी

**जरांगे पाटील यांचं बरं वाईट झाल्यावर मिळणारं आरक्षण वाजोंट : प्रवीण महाराज दुशिंग**


वैजापूर तालुक्यातील लोणीखुर्द येथे मराठवाड्याचे प्रवेशद्वार आरलेल्या तलवाडा येथील मराठा बांधवांनी 51 ट्रॅक्टर आणून मराठा लाख मराठा आरक्षण आमच्या हक्काच आशा प्रकारचे घोषवाक्याचे फलक हातात घेऊन म्रुदंग भजन करीत भव्य रॅली काढून उपोषण स्थळी दाखल झाले. लोणीखुर्द सर्कलमध्ये प्रत्येक दिवशी एक गाव व परिसरातील बहूसंख्य नागरीक साखळी उपोषण करत आहेत.

यात व्याख्यान, कीर्तन, भजनाचे देखील आयोजन करण्यात आले होते. यावेळेस शिव किरर्तनकार प्रविण महाराज दुशिंग यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.

त्यावेळी बोलतांना डॉ.प्रवीणदुशिंग यांनी शिवरायांच्या राज्यात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा कुठलाही उल्लेख नाही. शिवरायांच्या राज्यात शेतकरी फार सुखी होता कारणमहाराजांच्या राज्यात शेतकर्यासाठी विषेश तरतूदी होत्या. त्यांना बिना व्याज कज् दिलेल्या जात होते परंतु आज परीस्थिती बदलली आसुसून जगाचा पोशिंदा शेतकरी आरक्षणासाठी आत्महत्या करीत आहे. त्यांना वाचवण्यासाठी सरकार कहींच उपाय योजना करताना दिसत नाही. खूपप मोठ्या कालांतराने निस्वार्थ नेतृत्व मनोज पाटील जरांगे पाटलांच्या रुपात मिळाल ते आपण जपल पाहीजेत त्यांनी त्यांच्या जिवाच काही वर वाईट झाल्यास होणार उद्रेक सरकारला नाकी नऊ येतील, असे दुशिंग म्हणाले.



**समाजाच्या भावनांशी खेळु नका विनोद पाटील**
मराठा आरक्षणाचा विषय मार्गी लागेल असे वाटत होते, ऐवढ्या मोठ्या प्रमाणात पुरावे मिळूनही आरक्षण मिळण्याची विलंब का आजुन बाई घेण्याची सरकार वाट पहात आहेत का अशी खंत विनोद पाटील यांनी व्यक्त केली. पुरावे असूनही आरक्षण न देणे हे सरकारचे षड्यंत्र असल्याची टीकाही त्यांनी केली. दरम्यान, आज राज्यातील अनेक नेते पदाचे राजीनामे देऊन सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न करीत आहेत राजीनामे देऊन नका सरकारला धारेवर धरा. पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राज्य शासन मराठा समाजाच्या भावनांशी खेळत असल्याचा आरोप विनोद पाटील यांनी केला, ''मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस यांना मराठा समाजाचे कल्याण होऊ द्यायचे नाही. त्यांना ३० ऐवजी ४० दिवसांचा कालावधी देऊनही काही निर्णय झाला नाही. पुरावे मिळूनही आरक्षण न देणे हे सरकारचे षड्यंत्र आहे, यात शंका नाही. त्यातून समाजाची फसवणूक करण्यात येत आहे. पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री शिंदे यांना गोरगरिबांची गरज राहिली नाही.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# कोण कुणाकडे राहतंय ?

प्रख्यात लेखक, कवी, गीतकार प्रवीण दवणे यांच्याकडे एकदा काही कामानिमित्त जाण्याचा प्रसंग आला होता. त्यावेळी त्यांचे आईवडील दोघेही त्यांच्याकडे राहत होते. दोघेही बरेच वयस्कर झाले होते. त्यांचे बाबा थोडं फिरण्यासाठी म्हणून बाहेर गेले होते. आई घरी होती. त्या माऊलीनेच आम्हा दोघांसाठी चहा करून आणला. मी दवणे सरांना विचारले, ' आईबाबा तुमच्याकडे राहतात ? ' त्यांनी मोठे छान उत्तर दिले. ते म्हणाले, ' विश्वासराव, मी आईबाबांकडे राहतो. ' ते असं काही म्हणतील याची मी कल्पनाच केली नव्हती. मीच जरा ओशाळलो. खरंच आपण थोडं काही करायला लागलो की स्वतःला किती मोठं समजतो ! ज्या आईबाबांनी आपल्याला लहानाचं मोठं केलं, त्यांनाच आपण म्हणतो की ते माझ्याकडे राहतात. खरं म्हणजे आपण उलट म्हणायला हवं. दवणे सर जेव्हा म्हणाले ना की मी आईबाबांकडे राहतो, तेव्हा वाटलं खरंच किती छान आहे नाही असं म्हणणं ! आपण जोपर्यंत लहान असतो तोवर कसली काळजी ? आईबाबा असतात ना. त्यांच्या छत्रछायेखाली खुशाल राहावं. भलेही ते आता काही करू शकत नसतील. पण त्यांचे आशीर्वाद तर सदैव असतात ना सोबत ! आपण सारखं माझं माझं करत असतो. पण खरं तर आपलं असं काय असतं ? गोंदवलेकर महाराज आपल्या प्रवचनात एका ठिकाणी म्हणतात, ' आपली रामावर खरी भक्ती असेल तर आपण ज्या घरात राहतो, ते घर रामाचे आहे असे म्हणावे. मी रामाच्या घरात राहतो आहे अशी भावना असू द्यावी. ' एकदा आपल्या मनात ही भावना दृढ झाली की मी राहतो ते घर माझ्या आईवडिलांचे आहे, रामाचे आहे आणि मी सुद्धा त्यांचा आहे की मग अहंकाराला थारा उरतोच कुठे ! एकदा का हे घर त्यांचे आहे असे म्हटले की मग आपण त्यांना जसे आवडते तसेच वागू. त्यांना घरामध्ये वाईट गोष्टी आलेल्या आवडणार नाहीत अशी आपली पक्की भावना झाली की मग आपणच त्या वाईट गोष्टींपासून दूर राहू. घरामध्ये चांगल्याच गोष्टी होतील. अनीतीचा, भ्रष्टाचाराचा पैसा येणार नाही. वाईट सवयी, व्यसने यापासून आपण आपोआपच लांब राहू. अशा वेळी आपले घर म्हणजे एक पवित्र असे मंदिर होईल. मंदिरात जाताना जसे आपण आपली पादत्राणे बाहेर काढून ठेवतो, तसेच या घररूपी मंदिरात जाताना वाईट गोष्टी, विचार या बाहेरच सोडून मग घरात येऊ.





# आनंदी पहाट

## आनंद निर्मितीच्या मागील कारण महत्वाचे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

हल्लीच्या व्हर्च्युअल जगात संवाद आणि सहवास दोन्हीही इतिहासजमा होत चाललं आहे. संवाद होतो म्हणा तसा, पण व्हर्च्युअल पद्धतीने, प्रत्यक्ष भेटून अथवा फोनवर बोलूनही नाही, तर व्हॉटस् ॲपद्वारे.
त्यामुळे सहवासाचा तर प्रश्नच येत नाही. मी आणि माझं, आपण आणि आपलं या वैचारीकतेमुळे कुटुंबातील सदस्यांनी आपल्या स्वतः भोवती जणू लक्ष्मणरेषा आखून घेतल्याप्रमाणे वर्तन आणि विचार अंगीकारल्याचं दिसत आहे. आपल्या प्रत्येकाच्याच लहानपणी आपण अनुभवलेले प्रत्येक दिवस आनंददायी ठरत असंत.
लहानपणातलं आपलं निष्पाप बालमन त्यामुळेच सतत उत्साही असायचं. अगदी शाळेतले दिवस असतील, अभ्यास न केल्यामुळे घरच्यांचा खाल्लेला ओरडा असेल, अथवा मोठ्या भावंडाबरोबर झालेलं भांडण असेल; तरीही त्याचा कोणताही खोलवर परिणाम अंतर्मनावर फारसा होत नसे. भांडणे झाली तरीही काही वेळातच पुन्हा एकत्र येऊन खेळणे सुरु व्हायचं. पुन्हा आनंदी वातारवणात उरलेला दिवस मावळायचा. एकत्र असणं अथवा येणं हेच खरं तर त्या आनंद निर्मितीच्या मागचं कारण असायचं. सामाजिकदृष्ट्या आपणच आपलं अधःपतन तर करत नाहीत ना, हा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. आपलं नातं इतकं संकुचित ठेवण्याची कदाचित अनेकविध करणेही असतील. ती कारणे प्रत्येकाची भिन्न देखील असतील. पण निर्माण होणाऱ्या दुराव्याला जबाबदार कोण? ह्याचा बालमनावर काय आणि किती खोलवर परिणाम होऊ शकतो हे आपण समजू शकणार का? आणि कधी? अर्थात प्राप्त परिस्थितीचा विचार करून ह्यावर योग्य मार्ग काढणं महत्वाचं आहे. सुयोग्य पर्याय निवडून बालमनाला सांभाळणे आवश्यक असतं.



आधुनिक केसरी

**आणि गवसला | ब्रह्मानंद ||**

आनंदाचा नाश | अहंकारे झाला ||
म्हणूनी दुःखाला | ऊत आला ||१||
जाळते जीवाला | सत्संगाची वाण ||
नाशाचे कारण | कुसंगती ||२||
आळस जीवाचा | घातकी पाहुणा ||
म्हणूनी ही दैना | भाळी आली ||३||
तत्परता थोडी | रूजता अंतरी ||
भाग्य निरंतरी | दास होते ||४||
कुडीतला जीव | नंदादीप झाला ||
आणि गवसला | ब्रह्मानंद ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

तेंहि बुजलें निशेष ।जन्मकाळीं ॥३७॥
मस्तकद्वार तें बुजलें ।तेणें चित्त निर्बुजलें ।
प्राणी तळमळूं लागलें ।चहूंकडे ॥३८॥
स्वास उस्वास कोंडला ।तेणें प्राणी जाजावला
।मार्ग दिसेनासा जाला ।कासावीस ॥३९॥
चित्त बहु निर्बुजलें ।तेणें आडभरीं भरलें ।

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

पर उपकारी विश्व का, सर्व देश सब जाति । सब के शुभ चिन्तक रहैं, द्वन्द्व जाति नहिं पाति ।।१३।।(स्वर्वेद तृतीय मण्डल अष्टम अध्याय) ०३/०८/१३
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : ब्रह्मविद्या-प्रचारक सद्गुरू सर्व देश, सर्व जातींचे महान उपकारक आहेत. ते जाती-पातीच्या द्वंद्व रहित सर्वांचे शुभचिंतक आहेत.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# शारदीय नवरात्र (माळ सातवी)

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

पण त्याचवेळी दैत्यगण खूप चिडले आपल्या शिवाय महा पराक्रमी या जगात कोणी नाही . या फाजील आत्मविश्वासाने ते देवीशी युध्द करायला तयार झाले. आतापर्यंत असुरांना आव्हान देणारे या जगात कोणी नव्हते. आता त्यांना शह द्यायला एक शक्ति निर्माण झाली म्हणून असूर खूप चिडले. त्यांना असुरक्षित वाटू लागले. असुरगण *चिक्षुर दाही दिशांचे अंतर कापत कापत, भयंकर शस्त्र-- संभार प्रचंड सैन्यासह व पूर्वीच्या यशाच्या धुंदीने व अत्यंत उन्मत्त झालेल्या दैत्य सेनापती चिक्षुर अत्यंत उतावळे पणाने देवीचा पाडाव करण्याच्या हेतूने रणांगणात उतरला. चतुरस्त्र सैन्य ढाल, तलवार गंजरथ [हत्ती जोडलेले महाबलाढ्य रथ] अश्वदळ, महाबलाढ्य कधीही न हरणारे पायदळ असा क्रुर उग्र राक्षस युध्दासाठी तयार झाला. या महादैत्याच्या छळाने प्रजा त्रस्त झाली होती. महाहनु कोट्यवधी सैन्य, रथदल, अश्वदल महाहनु राक्षसाने आणले. असिलोमा  पाच कोटी तलवारीसह सैन्य घेऊन असिलोमा राक्षस युध्दासाठी तयार झाला. बाष्कळ  साठ लाख रथ व शस्त्रास्त्रांनी सुसज्ज सेनेसह युध्दासाठी बाष्कळ नावाचा राक्षस युध्दासाठी तयार झाला.कोट्यवधी रथ, घोडेस्वार,गजवीर आपल्या बरोबर घेऊन बिडाल राक्षस युध्दासाठी दाखल झाला. असुर शक्तींच्या परिवारातील राक्षसगण, घोडेस्वार, शस्त्र अस्त्रासह युध्दासाठी तयार झाले. हे सगळे असुर माता भगवतीशी युध्दासाठी तयार झाले. त्यांना कळत नव्हते की आपण कुणाशी युध्द करतो ते!!!गर्वाने उन्मत्त झाल्याने अशी परिस्थिती निर्माण झाली. याशिवाय स्वतः महिषासुर, असुरांचा राजा देवांचा विजेता म्हणून अश्वरथ, शस्त्रास्त्रे, शस्त्रे, शक्ति,

# प्रपंचातले विषयसुख हे खरे सुख नाही

आधुनिक केसरी

मनुष्य जगात कितीही मोठा असला तरी त्याच्या प्रपंचात काहीतरी न्यून असतेच. न्यूनता नाही असा प्रपंचच नाही. एखादा प्रापंचिक 'माझा प्रपंच पूर्ण आहे ' म्हणून सांगणारा भेटेल, परंतु 'चालले आहे असेच चालावे, यात कमी तर नाही ना कधी पडणार ?' अशी त्याला काळजी असतेच; म्हणजे त्याला खरे सुख असे नसतेच. एखादा अत्यंत विषयी, त्याला कदाचित् काळजी नसेल. दारूच्या धुंदीत असणाऱ्याला राजाचीही पर्वा नसते, वस्त्राचीही शुद्ध नसते, आणि तो आपल्याच धुंदीत, आनंदात असतो; पण हे सर्व त्याची धुंदी उतरली नाही तोपर्यंतच. विषयातले सुख परावलंबी, विषयांवर अवलंबून असते. विषय हे नश्वर, आपल्यापासून कधी तरी जाणार; निदान आपल्याला तरी त्यांच्यापासून एक दिवस जावे लागणार. दुसरी गोष्ट म्हणजे, विषयाचे सुख इंद्रियाधीन असते. इंद्रिये विकल झाली म्हणजे सुख कसे मिळणार ? उद्या आपण मरणार हे समजले की कोणते



विषय आपल्याला सुख देतील ? सारांश, विषयात सुख नाही. जे सुख होतेसे वाटते ते आपल्यातच असते, आणि ते विषयापासून मिळते अशी आपली फसवणूक मात्र होते. तर मग सुख कशात आहे ? पुष्कळ वस्तू पुष्कळ मिळाल्या तर पुष्कळ सुख मिळते हा भ्रम आहे. खरे किंवा पुष्कळ सुख म्हणजे कायमचे, सनातन सुख होय. ते सनातन वस्तूपाशीच, म्हणजे भगवंतापाशीच असते. आपल्याप्रमाणे पशूंनाही विषयसुख आहे; त्यांच्यात आणि आपल्यात फरक तो कोणता ? मी कोण, कशासाठी आलो, असा विचार करणे याला सारासार विचार म्हणतात. प्रपंचातही आपण विचार करतोच; कशात आपला फायदा आहे, कशात आपला तोटा आहे, हे बघतो. पण सर्वच असार, त्यात सार ते कुठुन, कसे येणार ? असलेल्या परिस्थितीत आपण समाधान मानीत नाही. त्याहून अधिक सुखाच्या स्थितीची इच्छा धरतो. देवाची भक्ति करणे, संतांकडे जाणे, हे सुद्धा विषय मिळविण्याकरिता आपण करतो; मग ही आपली सेवा, भक्ति विषयांची झाली का संतांची ? देव, संत, यांचा उपयोग इतर गोष्टींप्रमाणे विषय मिळविण्याचे साधन म्हणून नाही का आपण करीत ? मांजर आडवे गेले की, आपले काम होणार नाही, ही भगवंताची सूचना आहे, असे समजून आपण परततो; पण एक बायको मेली की दुसरी करण्याच्या विचाराला लागतो ! सारांश, आपले ध्येयच विषय हे असते, आणि ते मिळविण्याची आपली खटपट असते. खरोखर, जो मनुष्य प्रपंचातला आपला अनुभव जमेस धरीत नाही, तो कशानेच शहाणा होत नाही.

# स्वामीनारायण

स्वामी नारायण संप्रदायाचा इतिहास फार जूना आहे. या संप्रदायाला पहिले उद्धव संप्रदायाच्या नावाने ओळखले जात असे. स्वामीनारायण उर्फ नीलकंठ वर्णी यांना स्वामीनारायण संप्रदायाचे जनक किंवा संस्थापक मानलं जातं. या संप्रदायाचे प्रवर्तक नीलकंठ वर्णी उर्फ सहजानंदजी यांचा जन्म उत्तरप्रदेशच्या गोंडा जिल्ह्यातल्या छपिया नावच्या गावात झाला. सध्या या गावाला स्वामीनारायण छपिया नावाने ओळखलं जाते. या संप्रदायाशी आजवर लाखोंच्या संख्येने लोक जोडले जातात. नीलकंठी वर्णी यांनी ६ मंदिरांची स्थापना केली. मुख्य मंदिर त्यांचे जन्मस्थान गोंडा छपिया इथे आहे.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, ३१ ऑक्टोबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# नेत्यांना गावबंदी; वाढत्या सामाजिक दरीचा उद्रेक ?

## आरक्षणाचा प्रश्न संवेदनशील तो सोडवावा : आधुनिक केसरी जनचर्चेत मंथन




आधुनिक केसरी

**मराठा समाज आरक्षण आणि मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची सध्या सर्वत्र चर्चा आहे. श्री. जरांगे यांनी सरकारला दिलेले 40 दिवस पूर्ण झाल्यावरही आरक्षण न मिळाल्याने महाराष्ट्रात ठिकठिकाणी राजकीय पुढाऱ्यांना गावबंदी व आंदोलने होत आहेत. या संदर्भात "नेते चुलीत गेले.,अन चुलीत गेला पक्ष..." असे गावागावात लागत असलेले बॅनर या आंदोलनाची धग वाढवत आहेत. सोबतच पुढाऱ्यांना ठिकठिकाणी जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. जनतेचे प्रश्न धगधगते ठेऊन पुढाऱ्यांनी महत्त्वपूर्ण दुर्लक्ष केल्यामुळे असे प्रश्न संवेदनशील होताना दिसत आहेत. हा वाढत्या सामाजिक दरीचा उद्रेक तर नाही ना? असा अस्वस्थ प्रश्न यानिमित्ताने साहित्यिक वर्तुळातून आधुनिक केसरी जनचर्चेत मंथन करताना विचारला गेला..**

आधुनिक केसरी जनचर्चा

### आरक्षणाचा मुद्दा सरकारने संवेदनशीलतेने हाताळावा....

मराठा समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा हा आता संवेदनशील झाला आहे. सरकारने वेळीच या मुद्द्याकडे लक्ष घालून हा प्रश्न गंभीरतेने सोडवायला हवा होता. अनेक दिवसापासून हा प्रश्न सरकारने लोंबकळत ठेवल्यामुळेच प्रश्नात प्रश्न खूप निर्माण झाले आहेत. सरकार केवळ फक्त राजकारण करताना दिसत आहे. सरकारमधील राज्यकर्तेही या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहताना दिसत नाहीत.ते राजकारणात फक्त स्वार्थ पाहत आहेत. अभ्यासू, प्रामाणिक आणि नैतिकता असलेले राज्यकर्ते आज दिसत नाहीत. त्यांच्याकडून काही शिकावे असेही त्यांच्यात काही दिसत नाही. सरकारने वेळीच प्रश्न न सोडवल्यामुळे आज विविध जातीतील आरक्षणाचे प्रश्न गंभीरपणाने निर्माण झाले आहेत. जनतेला भुल थापा देणे, असे प्रश्न भिजवत ठेवणे हेच आजचे नितीहीन राजकारणी करताना दिसत आहेत. आरक्षणाच्या मुद्यावरून समाजा समाजामध्ये, जाती-जातीमध्ये जातीय तेढही मोठ्या प्रमाणावर निर्माण होताना दिसत आहे. राष्ट्रीय एकात्मतेला तडा जात आहे. आज मराठा बांधव आत्महत्येकडे वळत आहेत. आत्महत्या करणे हा मार्गही चुकीचा आहे. त्यांनी आत्महत्या करू नयेत. त्यामुळे सरकारने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन समाजातील एकता राखण्याच्या दृष्टीने संविधानिक मार्गाने हा प्रश्न लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करायला हवा.

**- प्रा. डॉ. सतीश मस्के साहित्यिक**

### तापलेल्या प्रश्नाला जबाबदार कोण...?

राजकीय साधनसुचिता हरवून गेलेल्या राजकारण्यांना ते जेव्हा मते मागायला येतात तेव्हा काही गोष्टींचा जाब विचारालाच हवा. जनतेच्या सोईसुविधांना वाटाण्याच्या अक्षता लावणाऱ्या आणि जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या या प्रवृत्ती जनतेप्रती असलेले आपले कर्तव्य विसरून विचित्र उन्मादात वावरत आहेत. जननिष्ठा खुंटीला, नैतिकता वाऱ्यावर आणि बेशिस्तपणाचा कळस गाठून हे पुढारी एकमेकांचे पाय ओढण्यात गुंतलेले आहेत. आणि त्यामुळेच या लोकप्रतिनिधींना मध्यमवर्गीय, गरीब, वंचित लोकांच्या प्रश्नांचे गांभीर्य उरलेले दिसत नाही. आणि यामुळेच देशाचे आणि जनतेचे अतोनात नुकसान हे डोळ्यात खोलवर बोटे घालत आहे. सध्या तापलेल्या संवेदनशील प्रश्नांचे गावागावात लागलेले होर्डिग्ज हीच खदखद दर्शवून जातात. याचा भविष्यात उद्रेक झाला तर याला जबाबदार कोण? हा प्रश्न अस्वस्थ करतो.

**- बाळासाहेब जोगदंड साहित्यिक**

### राजकीय मक्तेदारी मोडून काढणे गरजेचे?

मराठा आरक्षण हा विषय महाराष्ट्र आणि इतर राज्यांमध्ये व्यापकपणे चर्चेत आहे. महाराष्ट्रात, मराठा आरक्षणाची मागणी आणि त्याच्या अनुमोदनाच्या प्रक्रियेत विरोधाभास हा योग्य नाही.
राजकीय नेत्यांच्या बोलघेवडेपणा विचार करण्यास भाग पाडतो. काही तुटपुंजे नेते समर्थनात आहेत, काहींना मराठा आरक्षणाची मागणी अनिवार्य आहे असे वाटते तर इतर नेते अनिवार्यता नको या भूमिकेतून पडद्याआडून आहेत.
राजकीय नेते आपल्या पक्षाच्या आवडीवर आधारित काम करताना दिसतात. त्यांच्या पक्षाच्या अनुयायांसाठी सार्थक प्रयत्न करताना दिसतात. मात्र आरक्षण हा विषय समाजातील संवेदनशीलतेच्या विषयांमध्ये एक अत्यंत महत्वाचा असा विषय आहे.नेत्यांना गावबंदी किंवा गावातल्या समाजातील उद्रेकाच्या महत्वाच्या मुद्द्यांमध्ये आहे तो ओळखला पाहिजे. गावबंदी म्हणजे समाजातल्या समाजात दुही निर्माण करणाऱ्या गोष्टींना नियंत्रित करणारी प्रक्रिया आहे. ज्यामुळे समाजातल्या सामाजिक दरीच्या उद्रेकाच्या परिणामांची शक्ति आणि प्रभाव कमी होतात. सर्वच समाजांमध्ये सामाजिक दरीचा उद्रेक असल्याचे सत्य आहे. सामाजिक विभिन्नता, वर्गातील भिन्नता, जातीच्या भिन्नता, लिंगाच्या विविधता, आदी त्याचे स्वाभाविक भाग आहेत. अन्यायाच्या असलेल्या गोष्टींच्या विरुद्ध उद्रेक म्हणजे सामाजिक दरीचा उद्रेक. हा उद्रेक समाजातील न्याय, समानता, आणि सहानुभूतीच्या मुळ गाभ्याला हात घालने म्हणजे जनतेचे रोष ओढवून




घेणे आहे.हा विषय एकट्या मराठा आरक्षण आंदोलनापुरता मर्यादित नसून इतर समाजात सुध्दा धगधगता विषय आहे. राजकीय भांडवलाच्या मक्तेदारीवर सर्व घटक पिसून निघाला आहे.

**- वसंत राठोड, लेखक मुंबई**

### सत्ताधाऱ्यांना आरक्षण द्यावे असे मनातून वाटते का?

खरे तर मराठा आरक्षणाचे हे भिजत घोंगडे बऱ्याच दिवसांपासूनचे आहे.
आतापर्यंत सत्तेतील लोकांनी मराठा आरक्षणासाठी प्रयत्न केले नाही असे नाही. पण त्या प्रयत्नांना यश आले नाही. याचे कारण म्हणजे राजकीय इच्छाशक्तीचा अभाव. मग कुठेतरी असे वाटायला लागते की, खरेच सत्ताधाऱ्यांना मराठा समाजाला आरक्षण पाहिजे असे मनातून वाटते का? की फक्त वरवरचे प्रयत्न करून अर्ध्यातच सोडून द्यायचे हे कळत नाही. मग सर्वसामान्य जनतेने पुढाऱ्यांना गावबंदीचे फलक गावाच्या वेशीवर लावले तर या प्रश्नांची जाण आपण ठेवणार का?

**- उद्धव भयवाळ साहित्यिक**

### सत्वर निर्णय होणे गरजेचे....

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी सबंध राज्यभरात मराठा समाज आक्रमक झाला आहे.मागणी रास्त आणि महत्वाची आहे.राज्यामध्ये मराठा आमदारांची संख्या ही 70 टक्के पेक्षा जास्त आहे. पण वैचारीक एकजूट नाही. ते जनतेच्या मनातील खदखद जाणायला तयार नाहीत. सरकारने व आमदारांनी नेहमीच आश्वासनांना केराची टोपली दाखवली आहे.
ही सर्वसामान्य गोरगरीब लोकांची धग जर खरेच वाढली तर अवघड परिस्थिती निर्माण होईल.
कारण कित्येक आरक्षणासाठी बळी गेलेले आहेत हे लक्षात घेऊन सत्वर निर्णय घेणे आवश्यक आहे. राजकीय पुढाऱ्यांना सध्या नुसती गावबंदी होतेय पुढे आणखी काय काय होईल? हे चित्र अस्पष्ट आहे.

**- दत्ताबापु काळुंके, साहित्यिक, अंबाजोगाई**

### मराठा आरक्षण हा विषय अत्यंत संवेदनशील

मराठा आरक्षणाच्या प्रश्नाला महाराष्ट्र सरकारने गांभीर्यने घेण्याची गरज होती; परंतु राजकीय पुढाऱ्यांनी व मुख्यमंत्र्यांनी हा प्रश्न सहज घेतला. मनोज जरांगे यांना नेहमीच्या जनतेला देतात तसे आश्वासन दिले. खरेतर मराठा आरक्षण हा विषय अत्यंत संवेदनशील असूनही तो गांभीर्याने न घेण्याची सरकारने चूक केलेली आहे, दिलेल्या कालावधीत दिलेला शब्द पाळलेला नाही. एका महिन्यापूर्वी विद्यमान सत्ताधाऱ्यांनी वेळ मारून नेण्यासाठी काहीतरी थातूरमातूर; पण खरे वाटावे असे खोटे आश्वासन दिले आणि एका महिन्यात परिस्थितीत काय बदल होतो हे बघितले. ह्या धगधगत्या प्रश्नाला कसे सोडवावे हा पेच राज्य व केन्द्र सरकारला पडलेला आहे. मराठा समाजाच्या बहुसंख्य असलेल्या आमदारांनीसुद्धा ह्या प्रश्नाकडे मुद्दाम दुर्लक्ष केले आहे. मराठा समाजाच्या आमदार, खासदार, मंत्री व गर्भश्रीमंत लोकांना आरक्षणाची गरज नाही म्हणून त्यांनी गरजवंत मराठा बांधवांच्या ह्या प्रश्नाबाबत आस्था दाखवली नाही..हजारोच्या, लाखोच्या संख्येने आरक्षणासाठी अनेक मोर्चे निघाले तरीही या मोर्चाचे काहीच फलित झाले नाही. सध्या आरक्षण मिळावे म्हणून आंतरवाली सराटी येथील मनोज जरांगे हे अत्यंत तळमळीने, समाजासाठी प्राणाची बाजी लावून प्राणांतिक उपोषण करत आहेत. त्यांच्या त्यागाची एकाही पुढाऱ्यांनी दखल घेतली नाही. म्हणून मराठा तरुण समाजाच्या नेत्याविरुद्ध आपला आक्रोश व्यक्त करत आहेत. सरकारच्या खोट्या वेळमारू धोरणाची महाराष्ट्रातील सामान्य जनतेला झळ पोहोचलेली आहे यापुढेही पोहचणार आहे.

"नेते गेले चुलीत अन् चुलीत गेला पक्ष आरक्षण एकच लक्ष " असा मराठा तरुणांचा नारा असून नेत्यांना गावबंदी करत आहेत, साखळी उपोषणे करत आहेत ही बाब नेत्यांसाठी लाजीरवाणी आहे. सामाजिक दरी निर्माण करण्यासाठी नेत्यांनाच जबाबदार धरले जात असेल तर गरजवंत, गरीब, वंचित उपेक्षित मराठा समाजाचे चुकले कुठे ?

**ज्येष्ठ साहित्यिक डॉ.धोंडोपंत मानवतकर**

# राज्यातील ज्वलंत प्रश्नावर विधिमंडळाचे विशेष अधिवेशन तातडीने बोलवा : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात सध्या मराठा, ओबीसी समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आला असून या समाज घटकांमध्ये सरकारबद्दल तीव्र नाराजी व संताप आहे. या समाजांकडून आरक्षणची मागणी होत असताना सरकारी पातळीवर समाधानकारक काम होताना दिसत नाही. कमी पावसामुळे राज्यातील अनेक भागात दुष्काळाची स्थिती आहे, शेतकरी संकटात आहे, शेतमालाला भाव नाही. अंमली पदार्थांचे मोठे साठे सापडले असून राज्यात कायदा व सुव्यस्थेचा प्रश्नही गंभीर बनला आहे. हे सर्व प्रश्न राज्यातील जनतेच्या हिताचे असून या विषयांवर विधिमंडळात चर्चा होऊन राज्य सरकार काय उपाययोजना करत आहे हे जनतेला समजणे गरजेचे आहे म्हणून राज्य विधिमंडळाचे विशेष अधिवेशन तातडीने बोलवावे, अशी मागणी राज्यपाल महोदय यांच्याकडे करण्यात आली आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे. महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने आज राज्यपाल रमेश बैस यांची राजभवनभर भेट घेऊन



निवेदन दिले. यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री व काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, राजेश टोपे, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष आ. वर्षा गायकवाड, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, बसवराज पाटील, प्रणिती शिंदे, शिवसेना आमदार रवींद्र वायकर, आमदार सुनील प्रभू, प्रदेश सरचिटणीस प्रमोद मोरे, देवानंद पवार आदी उपस्थित होते. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, मराठा समाजात असंतोषाची भावना असून उद्रेक होईल अशी स्फोटक परिस्थिती आहे. नेत्यांना मतदारसंघात फिरणे अवघड झाले आहे, कायदा सुव्यवस्था धोक्यात आली असून मराठा समाजातील तरूण आत्महत्या करत आहेत. राज्यपाल महोदय हे केंद्र आणि राज्य सरकारमधील दुवा आहेत त्यांनी राष्ट्रपती आणि पंतप्रधानांशी आरक्षण विषयावर बोलावे तसेच मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्याशी बोलून त्यांनाही आश्वस्त करावे. जरांगे पाटील यांची तब्येत प्रचंड खालावलेली आहे, अघटीत घडू नये यासाठी मध्यस्थी करा व प्रश्न सोडवा अशी विनंती करण्यात आली आहे. सरकार सकारात्मक तोडगा काढणार असेल तर आम्ही राजकीय जोडे बाजूला ठेऊन सहकार्य करण्यास तयार आहोत. परंतु सरकारमधील घटक पक्षच एकमेकांवर जबाबदारी ढकलत आहेत, तिघांनी सामूहिक जबाबदारी घेतील पाहिजे. या सरकारमधील लोक खोटे बोलण्यात पटाईत असल्याने राज्य सरकारवर कोणाचाही विश्वास राहिलेला नाही म्हणून विशेष अधिवेशनापूर्वी आरक्षणाच्या कायद्याचा मसुदा सार्वजनिक करावा. राज्यात दुष्काळ आणि शेतीचे प्रश्न गंभीर झाले आहेत पण राज्य सरकारने शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष होत आहे. सप्टेंबर महिन्यापासूनच राज्यातील विविध जिल्ह्यात टँकरने पाणी पुरवठा करावा लागत असून यात दररोज वाढ होत आहे. कमी पावसामुळे राज्यातील २४ जिल्ह्यातील खरीप पीकं गेली आहेत तर रब्बी हंगामाची स्थितीही फारशी चांगली नाही. शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली आहे. दिवाळीचा सण आठ-दहा दिवसांवर आला आहे आणि शेतकऱ्याचे हात मात्र रिकामे आहेत.

# सिसोदियांचा जामीन फेटाळला

आधुनिक केसरी

दिल्ली सरकारच्या अबकारी धोरण गैरव्यवहार प्रकरणातील कथित सहभागाबद्दल न्यायालयीन कोठडीत असलेले माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांचा जामीन अर्ज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावला आहे. राजधानी दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया फेब्रुवारी महिन्यापासून पोलीस कोठडीत आहेत. त्यांची सीबीआय आणि ईडीकडून चौकशी सुरू आहे. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि एसव्हीएन भट्टी यांच्या खंडपीठासमोर सिसोदिया यांच्या जामीन अर्जावर सुनावणी झाली. दिल्ली हायकोर्टाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळला होता. दिल्ली हायकोर्टाच्या या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. परंतु, सर्वोच्च न्यायालायनेही जामीन अर्ज नाकारला आहे. कायदेशीर प्रश्नांची उत्तरे मर्यादित स्वरुपात दिली गेली आहेत. विश्लेषणातील काही मुद्दे संशयास्पद आहेत, असे आम्ही म्हटले. परंतु, ३३८ कोटी रुपयांच्या हस्तातंरणाचा मुद्दा स्पष्ट आहे. त्यामुळे ही याचिका फेटाळून लावली आहे. आम्ही जामीन अर्ज फेटाळत आहोत. पुढील सहा ते आठ महिन्यांत हा खटला पूर्ण होईल. पुढील तीन महिन्यांच्या आत खटला संथपणे चालला तर याचिकाकर्त्याला जामीन अर्ज करण्याचा अधिकार असेल, असे न्यायमूर्ती खन्ना यांनी स्पष्ट केले. तर, याप्रकरणी फास्ट ट्रॅकवर चौकशी करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, ५ ऑक्टोबर सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत न्यायाधीशांनी सीबीआय आणि ईडीला खडेबोल सुनावले होते. अबकारी धोरण गैरव्यवहारत मनीष सिसोदिया यांच्याशी थेट संबंध असल्याचा पुरावा काय आहे? असा सवाल न्यायालयाने विचारला होता. सिसोदिया यांनी बेहिशेबी संपत्ती जमविल्याचे वस्तुस्थितीच्या आधारे आणि कायदेशीरीत्या कसे दर्शवाल? असा थेट प्रश्न न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती एसव्हीएन भट्टी यांच्या खंडपीठाने अंमलबजावणी संचालनालय (ईडी) आणि केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सीबीआय) यांना मागच्या सुनावणीत केला होता.
या गुन्ह्यातून कथितपणे पैसे मिळवणाऱ्या राजकीय पक्षाला आरोपी का बनवले नाही, असेही सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय तपास संस्थांना विचारले. सर्वोच्च न्यायालयाने सीबीआय आणि ईडीला अनेक प्रश्न विचारले. सिसोदिया यांच्याविरुद्ध खटला कसा चालवला गेला, असा सवालही न्यायालयाने ईडीला केला. दिल्लीचे मुख्य सचिव नरेश कुमार यांनी नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांना जुलै २०२२ मध्ये एक अहवाल सादर केला होता. मद्य परवाना देत असताना, त्या बदल्यात कमिशन स्वरूपात पैसे घेतल्याचा आरोप तत्कालीन उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यावर या अहवालात करण्यात आला होता. अहवालात दिलेल्या माहितीनुसार, उत्पादन शुल्कमंत्री या नात्याने मनीष सिसोदिया यांनी आपल्या अखत्यारीत मनमानी पद्धतीने आणि एकतर्फी निर्णय घेतले; ज्यामुळे राज्याच्या तिजोरीचे ५८० कोटींपेक्षा अधिक महसुलाचे नुकसान झाले. 'आप'चे दिल्ली सरकार आणि त्यांच्या पक्षातील नेत्यांना मद्य व्यवसायातील मालक व दुकानदार यांच्याकडून 'किकबॅक' आणि 'कमिशन'च्या बदल्यात पैसे मिळाले.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# आरक्षण गरिबी हटाव कार्यक्रम नाही

आधुनिक केसरी

**देशात सध्या विचित्र परिस्थिती निर्माण करून देशाचे वाटोळे करून लोकांमध्ये अज्ञान वाढवून लोकांच्या बुद्धीशी खेळून लोकांना निष्क्रिय करून मुळ समस्येपासून लक्ष विचलित केले जात आहे. परंतु लोकांना याची जाणीव नाही. भारत हा जातीप्रधान देश असल्याने जातीव्यवस्था एवढी मजबूत आहे की जातीच्या उतरंडी मध्ये एक जात दुसऱ्या जातीला कनिष्ठ समजते. कनिष्ठ जातीने मोलाचे, जागृतीचे व सत्य विचार जरी सांगितले तरीही वरच्या जातीतील लोकांना पटत नाहीत. परंतु वरच्या जातीतील लोकांनी चुकिचे, खोटे, काल्पनिक विचार जरी सांगितले आणि त्या माध्यमातून लोकांचे शोषण जरी केले तरीही लोकांना चिड येत नाही उलट ते शोषण करणाऱ्यांना, दिशाभूल करून स्वतः चे पोटभरणाऱ्यांना गुरु स्थानी मानतात.**

थोडक्यात आजही गुण, विचार, बुद्धी याची पारख सत्यता बघुन नाही तर जात बघुनच केली जाते हे कोणीही नाकारू शकत नाही. एकीकडे सर्व खाजगी संपतीचे खाजगीकरण करून त्या उद्योगपतींना विकल्या जात आहेत. खाजगीकरणा मध्ये आरक्षण लागु नसते तरीही आरक्षणाचा मुद्दा सरकार कडून तानवून धरून लोकांना महागाई, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, सुविधा, शेतमाल भाव, महिला प्रश्न, शेतकरी स्वहत्या अशा प्रश्नावर पडदा टाकुन आरक्षणाच्या माध्यमातून सामाजिक तेढ निर्माण करण्याचे चित्र उभे केले जात आहे. आरक्षणाचे क्षेत्रच शिल्लक नसतानाही आरक्षणा विषयी आंदोलन सुरू राहणे सरकारच्या फायद्याचे आहे. सध्या मराठा आरक्षणाचा मुद्दा सरकार दोन मिनटात सोडवू शकते परंतु सरकार मुद्दामहुन विषय वाढवत आहे. मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देऊन, ओबिसीची जातीनिहाय जनगणना करून ओबीसी संख्येनुसार आरक्षण मर्यादा वाढवणे एवढेच केले तरीही विषय संपतो परंतु सरकार उपकार केल्या सारखे वागुन विषय वाढवत आहे. दुसरी गोष्ट काही बरेच लोक आरक्षणाचा चुकिचा अर्थ काढून आरक्षणाची मांडणी चुकीच्या पद्धतीने करत आहेत. आरक्षणाचा संबंध थेट गरीबीशी जोडून गरिब आहोत म्हणून आरक्षण पाहिजे असे वक्तव्य केले जाते. मुळातच हे चुकीचे आहे. या साठी आरक्षणा मागची भुमीका लक्षात घेणे आवश्यक आहे. देशात सर्व प्रथम आरक्षण लागु केले ते राजर्षी शाहु महाराज यांनी. शाहु महाराज यांना आरक्षण लागु करण्याची गरज काय होती? याचे उत्तर शोधने आपले नैतिक कर्तव्य आहे. राजर्षी शाहु महाराज हे लोककल्याणकारी राजा होते. लोकांचा सर्वांगीण विकास म्हणजेच राज्याचा अर्थात देशाचा विकास असे शाहु महाराज यांचे स्पष्ट मत होते. राजर्षी शाहु महाराज राजे झाले आणि आपल्या राज्यात बघितले तर शिक्षण आणि नोकरी यावर ब्राह्मण वर्गाचीच मक्तेदारी होती. ब्राह्मण लोक अस्पृश्यता सोबतच जातीवाद भंयकर पाळत होते. म्हणून ब्राम्हणांसाठी बसण्यासाठी, जेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था व ब्राम्हणेतर लोकांसाठी इतर व्यवस्था होती. मानवतावादी राजर्षी शाहु महाराज यांना ह्या गोष्टी खटकल्या. शिक्षण आणि नोकरी यावर एकाच जाती धर्माची मक्तेदारी चालणार नाही, एकाच जातीची, वर्णाची मक्तेदारी ही देश विकासासाठी घातक आहे म्हणून सर्व जाती धर्मातील लोकांना शिक्षण व नोकरी मिळायला पाहिजे म्हणून राजर्षी शाहु महाराज यांनी आपल्या राज्यात पन्नास टक्के आरक्षण जाहीर करून कमीत कमी पन्नास लोक तरी ब्राम्हनेतर हे शिक्षण व नोकरी मध्ये पाहिजे अशी भुमिका होती. ब्राह्मण लोक जातीभेद पाळत होते, अस्पृश्यता पाळत होते. याच मुळे ते इतरांना आपल्या जवळ सुद्धा येऊ देत नव्हते. ब्राह्मण ज्या लोकांना जवळही येऊ देत नव्हते आरक्षणाच्या माध्यमातून राजर्षी शाहु महाराज यांनी ब्राम्हनेतर म्हणजे मांग, महार,चांभार, कुणबी, माळी या लोकांना ब्राम्हणांच्या बरोबरीने बसवून इतरांना सामाजिक प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली. भारतात सकाळी सकाळी एका विशिष्ट जातीचे तोंड बघणे अपशकुन माणला जायचा, इतर जाती सोबत जेवणे पाप माणले जायचे, एकमेकांचा स्पर्श पाप मानले जायचे, इतर जातीतील लोकांनी ब्राम्हणां समोर उभे राहणे धर्मद्रोह माणला जायचा, ब्राम्हणाबद्दल बोलणे पाप माणले जायचे. एवढे जाचक बंधने घालून दिलेले असल्यामुळे फक्त ब्राम्हणच शिक्षण, नोकरी या क्षेत्रात समोर होते. आणि इतरांना जात बघून शिक्षण व नोकरी नाकारून विषमतेची वागणूक दिली जायची. लोकांमध्ये बंधुभाव निर्माण होऊन, जातीभेद नष्टव्हावा,समतेची पेरणी होऊन प्रत्येक जाती धर्मातील लोकांना संधी मिळून त्यांना सामाजिक प्रतिनिधित्व मिळावे, कोणत्याही जातीला जातीचा म्हणून कोणतीही नाकारली जाऊ नाही म्हणून आरक्षणाची सुरवात राजर्षी शाहु महाराज यांनी केली. राजर्षी शाहु महाराज यांनी आरक्षण देताना गरिबी श्रीमंती याचा विचार केला नव्हता तर कोणा कोणाला जातीच्या आधारावर समोर येऊ दिले जात नाही, कोणाकोणाला सोबत विषमता पाळुन सामाजिक मागास बनवले गेले अशा लोकांना सामाजिक प्रगत बनवण्यासाठी राजर्षी शाहु महाराज यांनी आरक्षण सुरू केले. आरक्षण गरीबी हटवण्यासाठी नाही तर सामाजिक प्रतिनिधित्व बहाल करून विषमता नष्ट करण्यासाठी निर्माण केले गेले आहे हे तरी समजून घेणे आवश्यक आहे. जेथे माणसाचा माणसाला स्पर्श करणे, सार्वजनिक ठिकाणचे पाणी पिणे, गावातून ऐटीत चालने, चांगले कपडे घालने हे लोकांना पचत नव्हते. याला काही लोक विरोध करत होते अशा लोकांना मानसन्मान निर्माण करून जातीभेद पाळणाऱ्या लोकांच्या सोबत बसवून विषमता दुर करण्याची क्रांती म्हणजे आरक्षण होय. दुरदृष्टी असलेल्या व सामाजिक समता प्रस्थापित होण्यासाठी दिलेल्या आरक्षणाचा आज चुकीच्या पद्धतीने अर्थ काढला जातो हि शोकांतिका आहे. भारत हे जनकल्याणकारी राष्ट्र आहे म्हणून प्रत्येक जनतेच्या हिताचे कार्य सरकार ला करावे लागते. जागृत नागरिक असतील तर सरकार नागरिकांच्या हिताचे काम करत असते. परंतु नागरिक जागृत नसतील तर नागरिकांना भुलवुन त्यांच्या टाळुवरचे लोणी खाल्ले जाते आणि जनतेच्या समस्या वाढवल्या जातात. तरीही जन कल्याणकारी राष्ट्र असल्याने सरकार ला जनकल्याणासाठी योजना राबवाव्या लागतात. आज बरेच लोक म्हणतात आम्हाला आरक्षण नाही म्हणून आम्ही शिक्षण शिक्षण घेऊ शकत नाही, आरक्षण नाही म्हणून नोकरी मिळू शकत नाहीत. आरक्षण नाही म्हणून आम्ही गरीबच राहलो. आरक्षणाचा संबंध गरीबीशी जोडणे हे अज्ञान आहे. देशात गरीबांची संख्या कमी नाही हे मान्यच आहे. पण गरिबी निर्मुलनासाठी सरकारने अनेक योजना तयार करून गरिबी दुर करण्याचे प्रयत्न केले जातात. आरक्षण गरिबी हटाव चा कार्यक्रम नसुन प्रतिनिधित्व बहाल करते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. जसे गरिबांना सरकारने ने अन्न सुरक्षा योजना अंतर्गत अत्यंत कमी दरात शासकीय दुकानात अन्न उपलब्ध करून दिले आहे. गरीब बेरोजगार लोकांसाठी हाताला काम मिळून पगाराची हमी निर्माण करून देण्यासाठी रोजगार हमी योजना सुरू केली आहे. गरीबांच्या मुलांना शिक्षणाला मदत व्हावी म्हणून अनेक शिष्यवृत्ती सरकार देत असते. नँशनल मीन्स कम मिरीट स्कॉलरशिप दरवर्षी एक लाख गरीब विद्यार्थ्यांना सरकार कडून दिली जाते. प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजने अंतर्गत दरमहा गरीब विद्यार्थी मुलांना अडीच हजार रुपये तर मुलींना तिन हजार रुपये मिळतात. अजून प्रधानमंत्री यशस्वी योजना अंतर्गत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दरहा महा देऊन शैक्षणिक आर्थिक सहकार्य केले जाते, महाराष्ट्र एकलव्य शिष्यवृत्ती देखील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून सुरू करण्यात आली आहे. यासोबतच देशात वा विदेशात आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना संशोधन करण्यासाठी सरकार कडून वार्षिक लाखों रुपयांचे सहकार्य सारथी शिष्यवृत्ती अंतर्गत केले जाते. राहीला प्रश्न नोकरी चा तर आरक्षणाच्या माध्यमातून केवळ पन्नास टक्के जागा भरल्या जातात. उर्वरीत पन्नास टक्के तर खुल्या गटासाठी असतात. थोडक्यात काय तर गरीबी हटवण्यासाठी सरकार वेगवेगळ्या योजना करत असते ते सरकारचे कर्तव्य आहे. गरीब आहे म्हणून आरक्षण मिळावे हे अज्ञान आहे. आरक्षण मिळण्यासाठी तो सामाजिक व शैक्षणिक दृष्टीने मागास पाहिजे. अजूनही सोप्या भाषेत सांगायचे तर जात पाहून त्याला काही गोष्टी नाकारल्या गेल्या, जात पाहून अन्याय अत्याचार होत असतील, जात पाहून त्याचे नैसर्गिक हक्क अधिकार नाकारले जातील तरच अशा समुहाला आरक्षणाची तरतूद आहे. मराठा शब्द जाती वाचक नाही, वर्णव्यवस्थे नुसार कुणबी हे मागास आहेतच. म्हणून त्यांना आरक्षण देणे योग्यच आहे. परंतु जर गरिब आहोत म्हणून द्या हि मागणी मान्य होणार नाही. गरिब असणे आणि मागास असणे यात खुप फरक आहे. मागास लोकांना सामाजिक प्रगत करण्यासाठी आरक्षण आहे. गरीब लोकांची गरीबी दूर करण्यासाठी अनेक योजना असतात. म्हणून आरक्षणाचा संबंध गरिबीशी जोडणे हे अज्ञानच म्हणावे लागेल. हे बऱ्याच लोकांना पटणार नाही आणि पचणारही नाही. कारण सत्य पचवण्यासाठी खुप मोठे मन आवश्यक असते. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात एक आमदार व लोकसभा मतदार संघात एक खासदार असतो. यांना दरवर्षी करोडो रूपयांचे निधी मिळत असतात ते निधी यांना ग्रामविकास, जलसंधारण, आरोग्य, शिक्षण यावर खर्च करावे लागतात. म्हणजे आमदारांनी व खासदारांनी आपल्या निधीचा वापर आपल्या मतदारसंघात केला तर दरवर्षी करोडो रुपयाची उलाढाल होऊन मतदारसंघात आर्थिक बळकटी निर्माण होईल आणि गरिबी दुर व्हायला सुरवात होईल. म्हणून नागरिकांनी राजकीय षडयंत्रात न फसता जागृत होऊन जनतेच्या हक्काचे मिळवून घेण्यासाठी एकत्रित येऊन लढा देणे आवश्यक आहे. हे सर्व योग्य रितीने करायचे असेल तर मुळ मुद्यावरून दुर्लक्ष करून चालणार तर नाही पण ईव्हीएम ला विरोध करून बँलेट पेपरवर निवडणूक घेण्याचा आग्रह केला तर जनतेचे प्रश्न सुटायला सुरवात होईल.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# नदी पर्वताला देखिल छेदू शकते

आधुनिक केसरी

**धेय्य किती कठीण आहे अथवा जटील आहे हे महत्वाचं नाही तर आपले प्रयत्न कसे आहेत त्यानुसार यशाचा कळस निघतो. निरंतरता आणि सातत्य पुर्ण प्रयत्न असतील तर अशक्यप्राय असं काहिच नसतं .कठिण अति कठिण पर्वत ज्याला कोणीही छेदू आणि भेदु शकत नाही त्याला सुद्धा नदी आपल्या सातत्य पुर्ण प्रयत्नामुळे छेदुन पुढे निघते. एवढं प्रचंड मोठ महत्त्व निरंतर प्रयत्नांना असतं. प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनात काही ना काही लक्ष ठेवून असतो. मग आपल्या कडे असणार सगळं बळ ते लक्ष प्राप्त करण्यासाठी आपण वापरत असतो. बहुतेक वेळा लक्ष हे ताकदीने नाही तर निरंतर प्रयत्नांमुळे प्राप्त होत असत.**

लक्ष हे कितीही कठीण असल तरी ते निरंतर प्रयत्ना समोर छोटं असत पण आपल्या प्रयत्ना मध्ये निरंतरता खूप महत्वाची आहे लक्ष पुर्ती साठी आपण जेव्हा लक्षा प्रति समर्पित असतो तेव्हाच आपल्याला लक्ष प्राप्त होण्यापासून जगातील कोणतीही शक्ती दुर ठेवु शकत नाही. याचं उत्तम उदाहरण हे नदी आहे नदी हि विशाल अशा कठीण पर्वताला कठीण खडकाला देखिल छेदुन पुढे निघते ती आपल्या प्रचंड शक्ती ने नाही तर दैनंदिन सातत्य पुर्ण आणि अंखडित निरंतर प्रयत्न या विशेष गुणांमुळे कठीणात कठीण खडक देखिल फोडून पुढे निघते.कठीण लक्ष भेदायच असेल तर आपल्यालाकडे फक्त प्रचंड अशी शक्ति असुन चालत नाही. सगळ्याच बाबतीत शक्ति कामी येते असं नाही अनेक प्रसंगी अनेक ठिकाणी इच्छाशक्ती आणि सातत्य पुर्ण प्रयत्न हे देखील कामी येतात शक्ती पेक्षा निरंतरता सातत्य आणि अंखडीत प्रयत्न हे अंतिमतः यशोशिखरावर पोहचवतातच म्हणुन संघर्ष कोणत्याही प्रकारचा असु द्या फार फरक पडत नाही. निसर्गातील अथवा जीवनातील संघर्ष यशस्वी होण्यासाठी निरंतरता सातत्य ह्या बाबी महत्त्वपूर्ण आहेत. शक्ति ही निरुपयोगी आहे असं नाही पण शक्तिला योग्य प्रयत्नांची जोड देवून नदी ही आपल्या सतत अंखडीत व निरंतर प्रयत्न या गुणांमुळे कठिणात कठीण असणार्या पाशान खडकाला देखिल छेदुन भेदुन पुढे निघते जगात अशक्य प्रायः असा काहिच नसतं. कठिण डोंगर सुद्धा नदी आपल्या ताकदीने शक्ति बळाने नाही तर निरंतरता व सातत्य पुर्ण प्रयत्न यामुळे यशस्वीरीत्या हळूहळू कठिण खडक सुद्धा फोडुन नदी आपला मार्ग प्रशस्त करते. जीवनातील आपला मार्ग कसा आहे या पेक्षाही आपले प्रयत्न कसे आहेत हेच महत्वाचे आहे.महणुन आपला मार्ग किती खडतर आहे संघर्ष शील याचा अजिबात विचार न आपण आपल्या धेय्य प्रति समर्पित असल पाहिजे. डोंगर



कडे कपारी कठीण आति कठीण असा पाषण खडक जो कित्येक स्फोटकांनी सुद्धा सहजासहजी तुटत फुटत नाही अशा कितीही कठिण पर्वताला नदी आपल्या ताकदीने शक्ति ने नाही तर निरंतरता व सातत्य या अंगभूत गुण वैशिष्ट्या मुळे अखेर फोडून पुढे निघते. म्हणजेच निरंतर प्रयत्न आणि सातत्य या बाबींना जीवनात किती प्राधान्य महत्व असत याची जाणीव आपल्याला नदीकडून शिकण्या सारखी आहे. महणुन लक्ष गाठताना सदैव निरंतर अंखडित प्रयत्न असले पाहिजे.आपल्या जवळ किती बळ आहे किंवा किती शक्ति आहे यावर आपलं यश अंवलबून नसतं तर निरंतर प्रयत्न आणि सातत्य ठेवल तर काहीच अशक्य नसतं. नदीचा जेव्हा डोंगर माथ्यावरून उगम होतो तेंव्हा सुरवातीला नदीला सुद्धा डोंगर थेट वाहु देत नाही किंवा नदीजवळ बळ आहे म्हणून एका दिवसात डोंगराला छेदून नदी पुढे निघते असं होतं नाही. तर निरंतर प्रवाह प्रयत्न यामुळे हळूहळू टप्प्याने कठिण असा डोंगर सुद्धा छेदला जातो आणि या मध्ये नदीचं बळ नाही तर निरंतर प्रयत्न कामी येतात याच प्रमाणे जीवनात सुद्धा निश्चित धेय्य लक्ष्य गाठायच असेल तर नदीचे गुण वैशिष्ट्या आपल्याला स्वीकारून मार्गक्रमण कराव लागेल.आपण यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करतो या मध्ये दुमत नाही पण प्रयत्नांमध्ये निरंतरता सातत्य ठेवत नाही म्हणून कित्येकदा नजरेत आलेलं यश सुद्धा आपल्यापासून दूर जात. म्हणून यशस्वी होण्यासाठी अथवा आपल लक्ष्य अर्जित करण्यासाठी निरंतर प्रयत्न सातत्य हेच ब्रह्म अस्त्र असतं याची जाणीव ठेवून प्रयत्न केले पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# वडेट्टीवारांनी केली विकासकामांची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्याचे विरोधी पक्षनेता तथा ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी आपल्या मतदारसंघात विकासाचा झंझावात कायम ठेवत विकासकामांच्या माध्यमातून मतदारसंघाचा कायापालट केलेला आहे. ब्रम्हपूरी नगरपरिषद क्षेत्र हद्दीत निर्माणाधीन जलतरण तलाव, बगीचा व खुल्या रंगमंचाच्या बांधकामाची त्यांनी आज पाहणी केली.

राज्याचे विरोधी पक्षनेता विजय वडेट्टीवार यांच्या विशेष प्रयत्नातून वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत ब्रम्हपूरी शहरात जलतरण तलाव व बगीचा तयार करण्यासाठी ९ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला. सदरची विकासकामे प्रगतीपथावर असून आज सदर कामांची राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी पाहणी केली. या विकासकामांमुळे शहरातील नागरिकांना तसेच जलतरणपटुंना सोयीसुविधांचा आनंद लवकरात लवकर घेता यावा याकरिता वरील विकासकामे जलदगतीने करण्याचे निर्देश यावेळी उपस्थित संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी दिले.

याप्रसंगी नगरपरिषदेचे बांधकाम सभापती तथा गटनेता विलास विखार, नगरसेवक डॉ. नितीन उराडे, बाजार समितीचे सभापती प्रभाकर सेलोकर, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमुरकर, माजी न.प. उपाध्यक्ष बंटी श्रीवास्तव, नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी अर्शिया जुही, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता चहांदे, न.प. अभियंता आंबोरकर हे उपस्थित होते.

# विटाभट्टी येथे अभ्यासिकेचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहर महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयी सुविधांच्या विकास योजना अंतर्गत प्रभाग क्रमांक ३ देवपूर विटा भट्टी येथे अभ्यासिका बांधणे या कामांच्या शुभारंभ आज आ.फारुख शाह यांचे हस्ते करण्यात आला. आ.फारुख शाह यांच्या दूरदृष्टीमुळे देवपूर भागातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका व्हावे म्हणून त्यांच्या प्रयत्नाने अभ्यासिका साठी 25 लाख रुपये शासनाकडून मंजूर करण्यात आले. आमदारांनी शहरातील विविध भागातील चार ठिकाणी अभ्यासिका मंजूर करून घेतले असून आज देवपूर भागातील दुसऱ्या अभ्यासिका चे कामाच्या शुभारंभ आमदार फारुक यांचे हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाला नगरसेवक नासिर पठाण,नगरसेवक सईद बेग,नगरसेवक गणी डॉलर,कैसर अहमद, डीसेंट मास्टर, डॉ. दिपश्री नाईक, फातेमा अन्सारी, महेमुना अन्सारी, निजाम सैय्यद, हलीम शमसुद्दिन, डॉ.बापुराव पवार, आसिफ शाह, अल्ताफ पिंजारी, सुफी हाजी,फकिरा बागवान, नजर पठाण, सउद आलम, अबरार शाह, जुबेर शेख, अकिब अली सैय्यद,शहजाद मन्सूरी, अब्दुल रहीम शेख, आरिफ खान, गबा मिस्तरी, रियाज शाह, मोईन खान, साजिद शेख,हबीब अन्सारी, जावेद मिर्झा, आसिफ शेख, नईम शेख, सलमान अन्सारी, सादिक पठाण, समीर शाह,एकलाक अन्सारी, फैसल अन्सारी व प्रतिष्ठित नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.





# महर्षी वाल्मिकी जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** आज लोणार येथे महर्षी वाल्मिकी जयंती निमित्त भव्य मिरवणूक काढण्यात आली. सदर मिरवणुकीचे नियोजन महर्षी वाल्मिकी जयंती महोत्सव समितीने केले. यामध्ये त्यांनी महर्षी वाल्मिकी यांचे पात्र व लवकुश यांची पात्रे साकारली तर सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी लेझीम पथकाद्वारे सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शेकडो समाज बांधव, भगिनींना मोठ्या प्रमाणात सहभाग घेत मिरवणूक भव्य दिव्य साजरी केली. सदर मिरवणूक बस स्टैण्ड चौकात येताच याठिकाणी माजी जिल्हाध्यक्ष लक्ष्मण घुमरे, तालुकाध्यक्ष कॉग्रेस राजेश मापारी, न.प. गटनेते भुषण पाटील, जेष्ठ नेते साहेबराव पाटोळे, प्रकाश धुमाळ,शांतीलाल गुगलीया, कॉंग्रेस शहराध्यक्ष शेख समद शेख अहमद, संतोष मापारी, ओबोसो सेल शहराध्यक्ष अंबादास इंगळे, युवक कॉंग्रेस शहराध्यक्ष विकास मोरे, इत्यादीनी प्रतिमेचे पुजन केले. कॉंग्रेस पक्षाच्या वतीने महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. आमदार संजय रायमुलकर, संतोष मापारी माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती ,पांडुरंग सरकटे शहरप्रमुख, सौ.मनीषा नेवरे नगरसेविका, शुभम बनमेरू, शुभम देसाई यासंह अनेक सामाजिक, राजकीय पक्षाच्या नेते मंडळी उपस्थिती राहून शोभायात्रेची शोभा वाढवली. महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन केले. पुढे मापारी गल्ली मध्ये गोपाल बच्छिरे संघटक शिवसेना (उबाठा ) बुलढाणा जिल्हा यांनी उपस्थित राहून मिरवणूकीतल्या भक्तगणांना अल्पोहार वाटप केले. शिवछत्र मंडळाचे अध्यक्ष नंदु मापारी यांनी विनायक चौकात प्रतिमा पुजन करून अभिवादन केले. यावेळी भव्य शोभायात्रा यशस्वी व्हावी म्हणून अध्यक्ष म्हणून पवन नेवरे तर संपूर्ण व्यवस्थापण अनिल नेवरे, विशाल जाधव, जयदिप नेवरे, नंदकिशोर मादनकर, सचिन फोलाने, लक्ष्मण नेवरे यांनी सांभाळले. तर नंदु इंगळे, दत्ता नेवरे, कैलास नेवरे, अशोक मादनकर, सुधाकर मादनकर, सुदर्शन मादनकर, प्रशांत मादनकर, विनोद दांडगे यांनी सर्वांना सोबत घेण्यासाठी अथक परिश्रम घेतले, तर शोभायात्रा चे संचलन प्रविण इंगळे यांनी केले. यामध्ये मोठ्या संख्येने समाज बांधव आणि भगिनी व तरुणांनी सहभाग घेतला.

# वेरूळ येथे उपासकांना ५०० रेशन किटचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**वेरूळ :** खुलताबाद येथील 500 बौद्ध उपासकांना अन्नधान्याची व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. थायलंड येथील डू दे फाउंडेशन डॉक्टर दनाय चंचआवचआय यांच्यावतीने 500 बौद्ध उपासक ना अन्नधान्य व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यचे वाटप करण्यात आले. धम्मचक्र अनुप परिवर्तन दिनाच्या पूर्वसंध्येला सोमवारी वेरूळ येथील जय भीम बुद्ध विहारात हे दान सोहळा पार पडला. या सोहळ्यासाठी भन्ते लक्की यांचे मार्गदर्शन आणि धम्मदीप टूर जम्बोधी इंटरनॅशनल मेडिटेशन अँड कल्चर सेंटर यांचे सहकार्य लाभले. वेरूळ डान्स ग्रुप व अजंता डान्स ग्रुप च्या मुलांनी नृत्य गीतांनी डॉक्टर चंचावचाय च्या सह आलेल्या पाहुण्याचे स्वागत केले.




## महाराष्ट्र Business Katta












# अमृता प्रीतम : जागतिक साहित्यातील एक महत्त्वाचं नाव

आधुनिक केसरी

**अमृताजी एक अतिशय सुंदर ,बाह्यरूपी नाजूक ,परंतु हृदयात अंगार, विद्रोह व मेंदूत चिकित्सक बुद्धी असलेली पंजाबी लेखिका. "आवाज -ए-पंजाब" म्हणून गौरविलेल्या ह्या लेखिकेच्या साहित्याचा आवाज जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचलेला आहे. जात, धर्म ,पंथ या साऱ्यांच्या पलीकडे जाऊन मानवतावादी आणि जगण्याला भिडणारे लेखन करणाऱ्या या जागतिक दर्जाच्या लेखिकेला लोक साहिर लुधियान्वी यांच्या संदर्भानेही ओळखतात. परंतु त्या यापेक्षाही खूप वेगळ्या होत्या. इमरोज नावाच्या फरिश्त्यासोबत त्या राहिल्यात. ते अनामिक नातं दोघांनीही निभावलं. त्याला आजच्या परिभाषेत Live - in - Relationship असे म्हणतात. .Live -in-Relatoinship जगणारी त्या एक द्रष्टा व्यक्ती होत्या. अमृताजींचा जन्म 31 ऑगस्ट 1919 रोजी गुजरातवाला पंजाब मध्ये झाला. कर्तारसिंग आणि राजबिबी यांची त्या कन्या होत. त्या लहानपणापासूनच चिंतनशील एकाकी , एकट्या होत्या .त्या अकरा वर्षाच्या असताना त्यांच्या आईचा मृत्यू झाला. आई मरणाच्या दारात असताना त्यांना सांगण्यात आले की आई वाचण्यासाठी देवाला प्रार्थना कर. त्या बालिकेने प्रार्थना केली.**

मात्र आई वाचू शकली नाही. तेव्हापासून देवाबद्दलची त्यांची आस्था संपली. व त्यांना कळाले की देव अस्तित्वात अमृतवाणी जागतिक साहित्यातील एक महत्त्वाचं नाव म्हणजे अमृता प्रीतम. अमृताजी एक अतिशय सुंदर ,बाह्यरूपी नाजूक ,परंतु हृदयात अंगार, विद्रोह व मेंदूत चिकित्सक बुद्धी असलेली पंजाबी लेखिका. "आवाज -ए-पंजाब" म्हणून गौरविलेल्या ह्या लेखिकेच्या साहित्याचा आवाज जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचलेला आहे. . त्या लहानपणापासूनच चिंतनशील एकाकी ,एकट्या होत्या .त्या अकरा वर्षाच्या असताना त्यांच्या आईचा मृत्यू झाला. आई मरणाच्या दारात असताना त्यांना सांगण्यात आले की आई वाचण्यासाठी देवाला प्रार्थना कर. त्या बालिकेने प्रार्थना केली. मात्र आई वाचू शकली नाही. तेव्हापासून देवाबद्दलची त्यांची आस्था संपली. व त्यांना कळाले की देव अस्तित्वात असता तर त्याने प्रार्थना ऐकली असती .आई गेल्यानंतर त्या खऱ्या अर्थाने पोरक्या झाल्या. कारण वडील हे कवी लेखक असल्याने रात्रभर लिहायचे - वाचायचे . दिवसा झोप घ्यायचे. आजीने त्यांचे पालन पोषण केले आणि पुस्तकांनी त्यांना जगवले. पुस्तकांनी त्यांना रिक्ततेतून सशक्त केले . बुद्धीची धार तेज केली. मात्र माता पित्याच्या प्रेमाभावाने त्या प्रेमाच्या शोधात होत्या. ईमरोजच्या रूपात ते त्यांना मिळाले सुद्धा. कारण अमृताजीच एमरोजींचे संपूर्ण जग होत्या. तीक्ष्ण निरीक्षण क्षमता असलेल्या अमृताजींनी आजी सोबत राहत असताना लहानपणीच आपल्या बंडखोरीची झलक दाखवून दिली होती. त्यांच्या वडिलांचे काही मुस्लिम मित्र जेव्हा त्यांच्या घरी येत असत . तेव्हा त्यांना वेगळे ठेवलेल्या कप आणि ग्लास मधून पेय दिल्या जात होते. तेव्हा त्यांनी हट्ट केला की त्यांना सुद्धा त्याच कप आणि ग्लास मधून पेय द्यायला हवे.इथे या बालिकेच्या विचारांची विशालता लक्षात येते .शिवाय इथेच त्यांनी खऱ्या अर्थाने जातीभेद देखील मिटवला .याच सुप्ततेचा परिणाम असावा कदाचित ,तो परिणाम म्हणजे साहीर लुधियान्वी आणि अमृताजींचे प्रेम. यालाच माणसाच्या जीवनावर पडलेल्या सावल्याही म्हणतात. कुठलीही गोष्ट माणसाच्या आयुष्यात उगीचच घडत नाही .तिचे भविष्यकालीन संदर्भ असतात .आयुष्याने सुरुवातीला दिलेले हे संकेत सहजासहजी माणसाच्या लक्षात येत नाहीत त्याचाच प्रत्यय देणारी ही घटना. मनुष्य एखादी गोष्ट मिळवण्याचा मनापासून प्रयत्न करीत असेल तर ती गोष्ट त्याला मिळते. किंवा तो जसा विचार करतो तसा तो बनतो .याची प्रचिती देणारा त्यांच्या आयुष्यातील प्रसंग असा की , जेव्हा अमृता लहान होत्या तेव्हा त्त्यांच्या वडिलांनी त्यांना ईश्वराचे चिंतन करावयास सांगितले होते. तेव्हा सुद्धा मानसिक पातळीवर त्यांनी बंड केले. त्यांच्या मते ईश्वराचे चिंतन केल्यापेक्षा आपल्यावर प्रेम करणाऱ्या माणसाचे चिंतन करावे. जो आपल्याला गाणं ऐकविल, जो आपल्याशी खेळेल ,जो कागदावर आपले चित्र काढेल .व त्यांना गाणं ऐकवणारा साहिरजींच्या रूपात तर शेवटच्या श्वासापर्यंत साथ देणारा चित्र काढणारा साथीदार ईमरोजजींच्या रुपात मिळाला. जो आयुष्यभर त्यांची चित्रे रेखाटत राहिला .आजही अमृताजी ईमरोजींच्या चित्रात जिवंत आहेत .त्यांच्या हरेक पुस्तकावर त्यांचीच रेखाटणे आहेत .त्या रात्रभर लिहीत वाचत असताना ईमरोजजी त्यांच्यासाठी मध्यरात्री उठून त्यांच्या खोलीमध्ये हळूच चहा आणून ठेवत आणि निघून जात असत. अमृता यांच्या साहित्य निर्मितीमध्ये ईमरोज यांच्या ममत्वाचा फार मोठा वाटा आहे म्हणून इथे इमरोज यांच्या एका ओळीचा उल्लेख करणे महत्त्वाचे वाटते ते म्हणतात ,"आदमी औरत के साथ सोता है जागता क्यो नही"?. रसिदी टिकट ह्या त्यांच्या आत्मकथनामध्ये त्या स्वप्नांविषयी सांगतात की," किल्ल्यामध्ये मला बंदिस्त करून ठेवले जेथून बाहेर निघण्याचा कुठलाच मार्ग नाही अशावेळी मी संपूर्ण ताकद एकवटून आसमंताकडे झेप घेते व पहारेकरी भयभीत होऊन माझ्याकडे पाहत राहतात". दुसऱ्या स्वप्नाचा उल्लेख करताना



त्या लिहितात की, "लोकांचा जमाव माझ्या मागे लागलेला असताना मी पूर्ण शक्तीनिशी धावते तरीही जमाव आणि माझ्यातील अंतर कमी होते .पुढे समुद्र असतो. जमाव आनंदीत होतो की, आता पुढे कुठे जाणार ? पुढे मार्गच नाही. तेव्हा मी पाण्यावरून चालू लागते सारा जमाव किनाऱ्यावर थांबतो व मी पुढे निघून जाते ". त्यांना बंदिस्त करणारे लोक व त्यांचा पाठलाग करणारे लोक म्हणजे अमृताजींच्या बंडखोरीला मज्जाव करणारी त्यांच्या सभोवतालातील जनता होय . त्या त्यांना न जुमानता त्यांचे विधायक कार्य करत राहिल्या. शेवटी पंजाबी जनतेने त्यांच्या बंडखोरीचा स्वीकार केला व "आवाज - ए-पंजाब" म्हणून त्यांचा गौरव केला. हा आवाज त्यांच्या साहित्यातून ध्वनीत झालेला तर होताच शिवाय लाहोर आणि नंतर दिल्ली आकाशवाणी मध्ये सुद्धा हा आवाज होता. त्याकाळी रेडिओमध्ये नोकरी करणे हे देखील धाडसाचे काम होते.

प्रीतम सिंग सोबत लग्न झाले .मुले झाल्यानंतर घटस्फोट झाला .त्या दिसायला नाजूक असल्या तरी खंबीर होत्या. मुलांचा सांभाळ त्यांनीच केला. ईमरोज सोबत राहत असताना फारकत झालेल्या पतीला त्यांच्या शेवटच्या काळात स्वतःच्या घरात आसरा दिला. जन्मापासून मृत्यूपर्यंत त्या पुस्तकांच्या सहवासात राहिल्या त्यामुळे वाचन लेखन चिंतन हेच त्यांचे विश्व होते. कथासंग्रह ,कादंबऱ्या, कवितासंग्रह अशी त्यांची शंभराहून जास्त पुस्तके प्रसिद्ध आहेत. पिंजर चित्रपट त्यांच्याच कादंबरीवरील. अमृता काळाच्या मागे व पुढे जाऊन विचार करणारी व्यक्ती होत्या. LIVE IN RELATIONSHIP काळाच्या पुढे जाऊन विचार करण्याचे तर 'चेक नंबर 36 'हे काळाच्या शंभर वर्ष मागे जाऊन विचार करण्याचे उदाहरण आहे .या कादंबरीवर चित्रपट येणार होता. परंतु रेवातीसरण शर्मा यांनी त्याला नकार दिला. त्यांच्या मते हिंदुस्तानी जनता त्याला समजू शकणार नाही .अफाट कल्पनाशक्ती अमृताजींकडे होती .अर्थात त्या कल्पनाशक्तीला चिंतनाचीच जोड होती. भाषा ,धर्म राजकारण ,तत्त्वज्ञान, मानसशास्त्र या सर्व विषयांचा त्यांचा सखोल अभ्यास होता अनेक भाषांमध्ये त्यांच्या साहित्याचा अनुवाद झालेला आहे .नागमणी या मासिकाचे त्या संपादन करत असत. वारीसशहाला उद्देशून लिहिलेली त्यांची कविता अतिशय गाजलेली कविता आहे. (3) माणसाच्या आत देवता झोपलेल्या आहेत त्यांना जागे करण्यासाठी त्या आयुष्यभर लिहीत राहिल्या. असे त्या सांगतात 1983 मध्ये त्यांच्या "कागज और कॅनवास" या पुस्तकासाठी त्यांना भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. पंजाब रत्न हा पुरस्कार त्यांना अमरेंद्र सिंग यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. 1956 मध्ये साहित्य अकादमी अवार्ड मिळविणारी त्या पहिली भारतीय महिला आहेत. दिल्ली ,जबलपूर व विश्वभारती यासारख्या विद्यापीठाने त्यांना डिलीट देऊन सन्मानित केले .पद्मश्री, पद्मविभूषण हे अति मानाचे पुरस्कारही त्यांना मिळाले. ताश्कंद ,ताजिकिस्तान, मास्को अझरबैजान, बल्गेरिया, फ्रान्स लंडन, इटली इत्यादी देशाचे दौरे त्यांनी एकटीने केले. एवढ्या त्या भक्कम होत्या. कुणाच्या आधाराच्या कुबड्यांवर जगणे त्यांना मान्य नव्हते. इमरोज यांच्यासोबत राहूनही त्यांच्या पैशांचा वापर अमृताजींनी कधी केला नाही .स्त्रियांनी आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हावे असा संदेश त्यांच्या बोलण्यात येत असे आर्थिक सक्षमता हा स्त्री स्वातंत्र्यांमधला महत्त्वाचा मुद्दा आहे असे त्यांचे ठाम मत होते .जे जीवन त्या जगल्या ते त्यांनी निडरपणे, प्रामाणिकपणे आत्मकथनामध्ये मांडले .सिगरेट चा शौक त्यांना कसा व का लागला ? हे सांगण्याचे धाडस करणाऱ्या त्या धैर्यवान स्त्री होत्या. त्यांच्या सच्चेपणाची किंमत त्यांना मोजावी लागत असे. त्या कधी कोलमडून पडल्याही परंतु नव्या दमाने उठल्या सुद्धा . इतका प्रचंड आत्मविश्वास त्यांच्याकडे होता .प्रामाणिकपणा आणि बुद्धिमत्तेवर त्यांचा आढळ विश्वास होता . त्याची दखल जगाला घ्यावी लागली .1986 मध्ये पॅरिसच्या परिषदेमध्ये विविध देशांचे प्रतिनिधी आले होते. त्यांच्यामध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अमृताजी ह्या एकमेव होत्या. त्या परिषदेचा विषय होता.SCIENCE AND RELIGION SHOULD GO TOGETHER. या परिषदेमध्ये त्यांनी शोधनिबंध सादर केला त्या परिषदेमध्ये त्यांनी महजब या शब्दाऐवजी रूहानियत हा शब्द वापरण्यात यावा. अशी विनंती केली . ती सर्व देशांच्या प्रतिनिधींनी ना हरकत मान्य केली .हा त्यांच्या चिंतनाचा विजय होता. त्यांच्या "अक्षरो के सायें में" या पुस्तकामध्ये त्यां म्हणतात की,"सदाचार इन्सान के चिंतन और बुद्धि की सलामति का नाम है " अशा सदाचारी, चिंतनशील व बुद्धिवादी लेखिकेला त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त विनम्र आदरांजली.

शीला घरडे पाटील
9850140870


# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



भगवान राईतकर
संपर्क क्र. 9730332151

आधुनिक केसरी

**आशा है मेरी, अपनी दिवाली मनाऊँ ॥ मनुष्य हा उत्सव प्रिय प्राणी आहे... मग, तो कोणत्याही जातीचा, धर्माचा, पंथाचा किंवा देशाचा असो... त्याला उत्सव आवडतात. प्रत्येकाची उत्सव साजरा करण्याची पद्धती वेगळी पहावयास मिळते. काही विविध प्रकारची कपडे खरेदी करून उत्सव साजरा करतात, काही मौल्यवान वस्तू खरेदी करून उत्सव साजरा करतात, काही गरजवंत व्यक्तीच्या सोबत उत्सव साजरा करतात तर, काही आपल्या मनाप्रमाणे उत्सव आणि सण साजरे करीत असतात.**



उत्सवापूर्वी किंवा सणापूर्वी प्रत्येकजण उत्सव कशा पद्धतीने साजरा करायचा आहे ? याचे एक नियोजन करीत असतो. त्या उत्सवाविषयी त्याच्या मनामध्ये एक आशा असते. प्रत्येकजण आपल्या आशेप्रमाणे म्हणजे इच्छेप्रमाणे सण साजरे करीत असतो. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज 'दिवाळी' हा सण आपल्या इच्छेप्रमाणे साजरा करू इच्छितात. राष्ट्रसंतांना आपली दिवाळी साजरी करण्याची आशा आहे. सर्वसामान्य व्यक्तीच्या दिवाळी साजरी करण्याच्या संकल्पना ह्या स्वतःपुरत्या किंवा जास्तीत जास्त कुटुंबापुरत्या मर्यादित असतात. परंतु, संत हे जगाच्या कल्याणाचा विचार करणारे असल्यामुळे ते सदैव जनहिताच्या भावना मनात ठेवून, आपल्या जीवनातील अनेक उत्सव आणि सण समाजाच्या आणि राष्ट्राच्या हितासाठी कशा पद्धतीने साजरे करावेत ? याविषयी आपल्या विचारातून आणि आचारातून समाजाला उपदेश करीत असतात. दिवाळी सणाविषयी आपल्या मनातील आशा व्यक्त करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भजनाच्या टेकमध्ये म्हणतात की,

आशा है मेरी , अपनी दिवाली मनाऊँ ॥ टेक ॥

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना आपली स्वतःची दिवाळी साजरी करण्याची इच्छा आहे. कशा पद्धतीने वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना दिवाळी साजरी करायची ? याविषयी सविस्तरपणे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भजनाच्या प्रत्येक कडव्यांमध्ये सांगितलेले आहेत. कोणताही सण म्हटला की, त्या सणाच्या निमित्ताने सजणे हे आलेच. प्रत्येक शुभप्रसंगी , उत्सवामध्ये आणि सणाचे औचित्य साधून स्त्री आणि पुरुष छान कपडे परिधान करून आणि सुंदर दिसण्यासाठी जे - जे लागते, त्या सर्व गोष्टींचा उपयोग करून तयार होत असतात. परंतु, सर्वसामान्य माणसाचं सजवणे हे शरीराला असते. परंतु ,संत हे बाह्य सुंदरतेपेक्षा आंतरिक सुंदरतेला अधिक सुंदर करण्याकडे भर देत असतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे दिवाळी साजरी करायला सुरुवात करतांना सुरुवातीलाच त्यांच्या मनाला मन लावून सजवण्याची आशा व्यक्त करतात. आपल्यामधील सद् गुणाला आनंदाने हर्षोलित होऊन त्याचे गुणगान करण्याची आशा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्त करतात. मानवाच्या शरीरामध्ये असलेला काम आणि क्रोध हा काडीकचरा ज्ञानाच्या अंगणामध्ये या दिवाळीच्या निमित्ताने जाळण्याची आशा वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भजनाच्या पहिल्या मध्ये व्यक्त करतात की,

**अपने मनको मनसे सजाकर , हर्ष हर्ष गुण गाँऊ । काम क्रोध का कुडा - कचरा , ग्यान की अगन जलाऊँ ॥ १ ॥**


मानवी शरीरामध्ये असलेला तमरूपी अज्ञानाचा अंधकार दूर करून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज दिवाळी साजरी करू इच्छिता. तमगुणाची राग, हिंसा, कपट ,आळस, व्देष, आणि अविचार ही लक्षणे आहेत. या तम गुणामुळे जीवनामध्ये निर्माण झालेला अंधार हा प्रेमाचा दिवा लावून संपवण्याचे, वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात. ज्या वेळेला माणसाच्या हृदयामध्ये प्रेमाचा दिवा लावल्या जाईल, त्यावेळेस त्याच्या मनातील द्वेष संपुष्टात आलेला असेल. आपल्या मनामध्ये जर , उच्चनीचपणा असेल तर, दिवाळी साजरी करता येणार नाही. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे उच्चनीचतेचे फटाके फोडून, सर्वांमध्ये समानता आणून दिवाळी साजरी करण्याची इच्छा भजनाच्या दुसऱ्या कडव्यामध्ये व्यक्त करताना वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात की,

तम अज्ञान का सारूँ अंधेरा , प्रेमके दीप लगाऊँ । **निच - ऊँचता के फोडूं फटाके, सब मिल समता लाऊँ ॥ २ ॥**

प्रत्येक व्यक्तीच्या प्रगतीमध्ये महत्त्वाचा घटक जर, कोणता असेल तर , तो घटक म्हणजे मन. प्रत्येकाने जर, मनाला सजविले म्हणजे शुद्ध केले तर, त्या व्यक्तीच्या जीवनामध्ये सदैव दिवाळीचा अनुभव त्याला घेता येऊ शकतो. मन शुद्ध झाले म्हणजे मन सुंदर झाले तर, माणसाला सद्गुणाचे गीत गाता येते. सद्गुण अंगी आले की , अज्ञानरुपी अंधकार दूर होतो. यातून माणसाच्या अंगी समानता येते. अशा प्रकारची मनाची अवस्था झाल्यानंतर , माणसाची अवस्था ही भेदरहीत होते. अशा भेदरहित अवस्थेनंतर दिवाळी साजरी करतांना, सर्व घरं मला माझी वाटतात... आणि मी सर्वांचा आहे, असं वाटतं. अशा प्रकारचा शृंगार या दिवाळीच्या निमित्ताने करण्याची इच्छा वंदनीय महाराज व्यक्त करतात. दिवाळी या सणांमध्ये अभ्यंग स्नानाला फार महत्त्व आहे. दिवाळीच्या निमित्ताने सद्गुरूंचा विचारात , तत्वात व आदेशात रंगून जाण्याची इच्छा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भजनाच्या शेवटच्या कडव्यातून व्यक्त करतात. यामध्ये सद्गुरूंच्या विचाराचे स्नान करून, सद्गुरूंच्या विचारांशी एकरूप होवून, सर्वार्थाने समानतेची दिवाळी साजरी करण्याची आशा वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्त करतात की,

**सब घर मेरे , मै हु सबका , यही श्रृंगार चढाऊ । तुकड्यादास दिवाली नहाऊँ , सतगुरु संग रंग जाऊ ॥ ३ ॥**

प्रस्तुत भजन वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी स्वतः विषयी लिहिले असे वाटते. परंतु, प्रत्येक माणसाला त्यांच्या जीवनातील अंधकार संपवायचा असेल... आणि प्रकाशाची व प्रगतीची दिवाळी साजरी करायची असेल तर, तमगुणाचा अंधकार दूर करून आपल्या अंतःकरणात प्रेमाचा, आपुलकीचा आणि स्नेहाचा दिवा सदैव लावलेला ठेवावा... आणि सद्गुरूंच्या विचारांची सदैव आठवण ठेवत, समानतेची दिवाळी साजरी करावी, असा उपदेश प्रस्तुत भजनातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज करतात.



# लोहपुरुष वल्लभभाई पटेल



पंकज वसंत पाटील
मो. 9850430579

आधुनिक केसरी

**लोहपुरुष म्हणून ओळखले जाणाऱ्या वल्लभभाई पटेल यांचा आपला देश एकसंघ राखण्यात सिंहाचा वाटा होता. वल्लभभाई पटेल यांचा जन्म गुजरात राज्यातील नडीयाद शहराजवळ करमसद गावी ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी मूळ व्यवसाय शेती असलेल्या लेवा पाटीदार घराण्यात जव्हेरभाई गालाभाई पटेल व लाडबाई या दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचा जन्मदिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.वल्लभभाई वकिलीची परीक्षा पास होऊन डिस्ट्रिक्ट प्लिडर झाले. बॅरिस्टर होण्यासाठी वल्लभभाई त्यांनी इंग्लंडला जाऊन कायद्याचा सखोल अभ्यास केला.**

भारतातील एका शेतकरी घरातून आलेला हा तरुण इंग्लंडमध्ये येऊन बॅरिस्टर परीक्षेत प्रथम आल्याचे युरोपियनांना खूप कौतुक वाटले होते. इंग्लंडहून परतल्यावर त्यांनी गोध्रा येथे वकिलीची प्रॅक्टिस सुरू केली दहा वर्षे वकिली करून पैसा, नाव आणि प्रतिष्ठा कमावली. काही गोऱ्या मॅजिस्ट्रेटला धडे सुद्धा शिकविले. त्यांच्या निर्भीड वृत्ती मुळे त्यांचा दरारा होता. त्यांच्या एका खटल्याच्या वेळी कोर्टात दारू पिऊन आलेल्या कलेक्टरला खडसावण्याचे काम त्यांच्या निडरतेची साक्ष देते. १९१७ च्या गांधीजींच्या चंपारण्यात केलेल्या सत्याग्रहामुळे गांधीजी वेगळ्या मार्गाने लढणारे क्रियाशील व गरीबांचे नेते असल्याचे वल्लभभाईंना पटले. गांधीजींच्या सहकार्याने वल्लभभाईंनी विशेष प्रयत्न करून वेठबिगारीस मूठमाती दिली. गांधीजींच्या संपर्कात आल्यानंतर त्यांनी पाश्चात्त्य पोशाख बदलून ते धोतर-सदरा अशा साध्या पहेरावात राहू लागले. शेतसारा माफ करण्यासाठी त्यांनी केलेला खेडा सत्याग्रह, नंतर १९२२ साली राष्ट्रीय निशाण फडकवण्यासाठी केलेला झेंडा सत्याग्रह तसेच १९२३ सालचा बोरसद/बोरसाड सत्याग्रह यामुळे वल्लभभाईंच्या नेतृत्वाला झळाळी आली. १९२६ ते १९२८ पर्यंत चाललेल्या महात्मा गांधींच्या बारडोली सत्याग्रहात त्यांनी मोलाची कामगिरी बजावली. पटेल यांनी अतिशय कुशलतेने आणि शिताफीने चालवलेल्या सरकारविरुद्धच्या या चळवळीने भारतभर जनजागृती झाली. स्थानिक लोकांनी संघटित होऊन त्याग आणि कष्टाची तयारी ठेवल्यास स्वातंत्र्य मिळू शकते याची कल्पना या सत्याग्रहातून जनसामान्यास आली. या बारडोली सत्याग्रहापासून वल्लभभाईंना लोक आदराने 'सरदार' म्हणू लागले. गांधीजींचे अनुयायित्व स्वीकारले असले तरी पटेलांची गांधीजींवर अंधभक्ती नव्हती. सरकार पटेल हे द्रष्टे आणि मुत्सद्दी राजकारणी होते कुशल संघटकही होते. संपर्कात आलेल्या व्यक्तीचे गुण-अवगुण हेरून त्याच्या चांगल्या गुणांचा उपयोग देशहितासाठी करून घेण्याची कला त्यांना चांगली अवगत होती. सरदार पटेल यांचे पंडित नेहरूंशी काही तात्विक मतभेद असले तरी देशहीताची काळजी या दोघांनाही एकत्र ठेवत होती. सरदार पटेलांच्या जबर विश्वासार्हत्येमुळे स्वातंत्र्य चळवळीसाठी ते व्यापक सहभाग आणि पाठिंबा



मिळवू शकले. इतिहासाच्या पानांमध्ये सरदार पटेल यांची 'एकसंघ अशा अखंड भारताचे शिल्पकार म्हणून नोंद होईल' असे पंडितजी म्हणत.
स्वातंत्र्य संघर्षानंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाल्यावर देशापुढे अनेक प्रश्न उभे होते, त्यातील प्रमुख प्रश्न होता भारतीय संस्थानांचा. त्यावेळी देशात ५६० संस्थाने होती. सरदार पटेल हे स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान व गृहमंत्री होते. भारताच्या नकाशाकडे पाहिले तेव्हा देश अनेक संस्थांमध्ये विभागला गेला असल्याचे स्पष्टपणे दिसत होते. त्यावेळी सरदार पटेलांनी मोठ्या खंबीरतेने, कौशल्याने व हुशारीने संस्थानांना आपल्या विशेष कौशल्याने भारतात विलीन होण्यास भाग पाडले. जुनागड व हैदराबाद या संस्थांनासाठी बलप्रयोग करावा लागला असला तरी ती जबाबदारी सुद्धा त्यांनी पार पाडली. राजकीय कौशल्य, पारदर्शी व प्रामाणिकपणा, मातृभूमीविषयी तळमळ आणि जन्मभूमीची केलेली सेवा यांच्या जोरावर भारत देश विभाजित होण्याचे टाळून भारताला एकसंघ तसेच बलवान करण्यात ते यशस्वी झाले. विलीनीकरणाच्या वेळी त्यांनी दाखविलेली खांबीरता व सडेतोड धोरण यामुळे वल्लभभाईंना देशाचे 'पोलादी पुरुष' म्हणून मान्यता मिळाली.
ब्रिटीश प्रशासन गेल्यानंतर सरदारांनी नोकरवर्गाला विश्वासात घेऊन त्यांच्या मनात असलेली भीती घालवून त्यांच्यात आत्मविश्वास दृढ केला तसेच त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही हमी दिली. सरकार बदलले तरी सरकारी नोकरवर्ग ही देशाची स्टील फ्रेम आहे. सरकारी नोकरांमुळेच सरकारला व्यवस्थित काम करता येते, हे सर्वप्रथम त्यांनीच पटवून दिले त्यांच्या या कामगिरीबद्दल त्यांना 'भारतीय प्रशासनाचे आधुनिक शिल्पकार' म्हणूनही त्यांना संबोधले जाते. शेकडो वर्षाचे पारतंत्र्य संपून स्वातंत्र्याचा सूर्य उगवला तरी सरदार देशातिल अंतर्गत शांतता व परराष्ट्र हितसंबंध जोपासण्यासाठी अग्रेसर होते, १५ डिसेंबर १९५० रोजी ते सगळ्या चिंता मागे ठेवून इहलोकास निघून गेले. त्यांच्या योगदानासाठी भारत सरकारने त्यांना भारतरत्न पुरस्कार देऊन गौरावांवित केले आहे. गुजरात मधील नर्मदा नदीकाठावरील साधू बेटावर असलेला त्यांचा जगातील सर्वात उंच १८२ मीटर उंचीचा 'स्टॅच्यु ऑफ युनिटी' हा उत्तुंग पुतळा त्यांच्या भव्य कार्याची व एकात्मतेची साक्ष देत उभा आहे. आजही आपल्या देशातील एकात्मतेला घातक ठरत असलेल्या शक्तींचा नायनाट करणे ही या स्वातंत्र्यप्रेमाचा आणि वीरवृत्तीचा वारसा घेऊन जन्माला आलेल्या सरदारांना खरी आदरांजली ठरेल.

# जीवनात चारित्र्यवान माणसालाच किंमत




बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आधुनिक केसरी

**जीवन जगत असताना माणसाला चारित्र्याचे महत्त्व कळाले पाहिजे.आणि मानवी जीवनात चारित्र्यवान माणसालाच खरी किंमत आहे व तुमच्याकडे कितीही पैसा असूद्या, गाडी व बंगला असूद्या पण तुमचे चारीत्र्यच चांगले नसेल तर मग चारीत्र्याविना तुमचे भौतिक वैभव कवडीमोल आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे आणि ज्यांचे चारीत्र्य बावनकशी सोने आहे तोच या पृथ्वीतलावर खरा माणूस आहे. नाहीतर आजकाल जिकडे बघावे तिकडे चारीत्र्यहीन लोकांचाच सुळसूळाट जास्त झाला आहे.आणि चौका चौकात त्यांचाच बोलबाला जास्त झाला आहे.परंतू जे लोक खरोखरच नेक, इमानदार व इज्जतवान आहेत व ज्यांचे चारीत्र्य बावनकशी सोने आहे.ते लोक चार चौघात न रमता एकटे दूकटे राहात आहेत. आपल्यामूळे सज्जनांना त्रास होणार नाही याची खबरदारी घेत आहेत. प्रत्येक माणसाशी माणसासम वागत आहेत.अशा चारीत्र्यवान लोकांची संख्या फार कमी झाली आहे.ती वाढवणे काळाची गरज आहे.**

आपला भारत देश संतांचा, कलावंतांचा,थोर साहित्यिक व विचारवंतांचा देश म्हणून जगभर ओळखला जातो. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा फुले, शाहू महाराज व अन्नाभाऊ साठे हे महामानव याच मातीत जन्माला आणि या सर्वांचे चारीत्र्य बावनकशी सोने होते.म्हणूनच त्यांना आजही जणतेने डोक्यात कायमचे स्थान दिले आहे. सांगायचा मूद्दा काय तर त्यांच्या कार्याचा किर्तीरुपी सुगंध आजही दरवळत आहे व त्यांच्या कार्य कर्तूत्वाचा गवगवा आजही लोकांच्या मनामनात कायम आहे.या महामानवांनी आपल्या चारीत्र्याला कधीच डाग लागू दिला नाही. म्हणूनच हे लोक सर्व जगाच्या ओठावर आहेत. हे माहीत असतानाही लोक अशे चारीत्र्यहीन व माणूसकीहीन का वागतात? हाच प्रश्न मला राहून राहून पडतो. म्हणून लोकहो मानवी जीवनात आल्यावर रानटी जनावरांनसारखे न वागता माणसांसारखे वागा. नेकीने व इमानदारीने जीवन जगा. आपले चारीत्र्य डागाळू देऊ नका. माणूसकी व मानवता धर्म पाळा.जीवनात आल्यावर पैसा व आडका हे शेवटी काहीच घेऊन जायचे नाही.जीवनात पैसा तर कमवाच पण अगोदर जिवाभावाची चारीत्र्यवान माणसे कमवायला शिका.कमावलेली माणसेच एकदिवस आपल्या कामाला येतील. म्हणून मित्रहो आपल्याला कळकळीची नम्र विनंती आहे की,आपले लाखमोलाचे चारीत्र्य डागाळू देऊ नका.ते नेहमी शूध्द ठेवा.या जगात चारीत्र्यवान माणसांनाच जास्त किंमत आहे.हे नेहमी ध्यानात ठेवा.

# महान पंतप्रधान इंदिरा गांधी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**भारताच्या सर्वात सामर्थशाली पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा आज स्मृतिदिन. इंदिरा गांधींची भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वात सामर्थ्यशाली आणि महत्वपुर्ण नेत्यांमध्ये गणना होते. १९ नोव्हेंबर १९१७ रोजी त्यांचा जन्म झाला. इंदिरा गांधी यांना इंदिरा हे नाव आजी आजोबांकडून मिळाले. पण लहानपणी सर्वजण त्यांना प्रियदर्शनी म्हणून बोलवायचे. आई कमला नेहरु आणि वडील पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडून त्यांना देशप्रेमाचे बाळकडू मिळाले. लहानपणीच त्यांच्यावर देशभक्तीचे संस्कार झाले. कारण त्यांचे पूर्ण कुटुंबच स्वातंत्र्य लढ्यात अग्रणी होते.**

लहानपणापासूनच स्वदेश आणि स्वदेशी याविषयी त्यांच्या मनात प्रेम निर्माण झाले. अगदी लहान असतानाच त्यांनी विदेशी खेळणी व कपड्यांची होळी केली होती. एका पाहुण्यांनी त्यांच्यासाठी विदेशातून आणलेला किंमती फ्रॉक परिधान करण्यास त्यांनी नकार दिला होता. आजोबा मोतीलाल नेहरू व वडील पंडित जवाहरलाल नेहरू यांचे देश स्वातंत्र्य करण्यासाठी चालू असलेले आंदोलने पाहून आपणही या आंदोलनात सहभागी व्हावे असे त्यांना वाटे. वयाच्या अवघ्या १३ वर्षी म्हणजे सण १९३० साली त्यांनी आपल्या सवंगड्यांसह वानरसेना नावाची संघटना स्थापन केली आणि नेत्यांचे संदेश पोहचवण्याचे काम केले. इंग्रजांविरुद्ध मिरवणुका काढल्या, घोषणा दिल्या. त्यांचे सुरवातीचे शिक्षण अलाहाबाद, पुणे इथे झाले पुढे त्या रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतन येथे शिक्षण घेण्यासाठी गेल्या. तिथे त्यांनी शिक्षणासोबत विविध कलाही आत्मसात केल्या. वडील पंडित जवाहरलाल नेहरू स्वातंत्र्याचा आंदोलनात अग्रणी असल्याने बऱ्याच वेळा ते तुरुंगातच असायचे अशा वेळी इंदिरा याच आई कमला नेहरू यांची काळजी घ्यायच्या. १८ फेब्रुवारी १९३६ रोजी कमला नेहरू यांचे निधन झाले तेंव्हा त्यांना खूप दुःख झाले. या दुःखातून सावरण्यासाठी वडील पंडित नेहरू यांनी त्यांना विदेशात शिकण्यासाठी पाठवले. विदेशातून शिक्षण पूर्ण करुन आल्यावर २६ फेब्रुवारी १९४२ रोजी फिरोज गांधी या उमद्या व देखण्या तरुणाशी त्यांनी विवाह केला. विवाहानंतर फिरोज गांधी व इंदिरा गांधी यांनी स्वातंत्र्याचा चळवळीत भाग घेतला. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर त्या संसारात रमल्या. राजीव आणि संजीव या दोन मुलांच्या पालनपोषणातच त्यांचा वेळ जाऊ लागला. पुढे त्या काँग्रेसमध्ये सक्रिय झाल्या. १९५९ साली त्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा बनल्या. यावेळी त्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी खूप काम केले. १९६० साली पती फिरोज गांधी तसेच १९६४ साली वडील पंडित नेहरू यांचे निधन झाले तरी त्या खचल्या नाहीत. कठीण परिस्थितीतही त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. लाल बहादूर शास्त्री यांनी त्यांना मंत्रिमंडळात माहिती प्रसारण आणि नभोवाणी खात्याच्या मंत्रीपदाची जबाबदारी दिली त्यांनी ती लीलया पेलली. लाल बहादूर शास्त्रींच्या मृत्यूनंतर २४ जानेवारी १९६६ रोजी त्या देशाच्या पंतप्रधान बनल्या. त्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या. त्यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली पण त्यावेळी देशाची परिस्थिती खूप बिकट होती.भारत पाकिस्तानचे युद्ध झाले होते. देशात मोठा दुष्काळ पडला होता. अन्नविषयक मदतीचा पी एल ४८० कराराचे नूतनीकरण करण्यास अमेरिकेने नकार दिला होता. या आर्थिक परिस्थितीतुन मार्ग काढत असतानाच १९६७ सलची निवडणूक आली अनेक राज्यात काँग्रेसला पराभव स्वीकारावा लागला. लोकसभेत काँग्रेसचे संख्याबळ घटले. त्यामुळे पक्षातील सिंडिकेट नेत्यांनी उचल खाल्ली. पंतप्रधान इंदिरा गांधींनी आपल्या इच्छेप्रमाणे कारभार करावा असे त्यांना वाटत होते. त्यामुळे इंदिरा गांधी आणि त्यांच्यात वाद होऊ लागले त्यातूनच काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. जेष्ठांची सिंडिकेट विरुद्ध तरुणांची इंडिकेट असा उभा संघर्ष झाला. काँग्रेसमधील तरुण नेत्यांनी इंदिरा गांधी यांना साथ दिली. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत इंदिरा गांधी यांनी सिंडिकेटचे उमेदवार नीलम संजीव रेड्डी यांचा पराभव करुन व्ही व्ही गिरी यांना राष्ट्रपती बनवले. सिंडिकेटचा दारुण पराभव झाल्याने इंदिरा गांधी सामर्थ्यवान बनल्या. मंत्रिमंडळात त्यांनी बदल केले. उपपंतप्रधान मोरारजी देसाई यांच्याकडील अर्थखाते त्यांनी स्वतःकडे घेऊन मोरारजी देसाई यांना बाहेरचा रस्ता दाखवला. त्यानंतर त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले. १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे, संस्थांनीकांचे तनखे रद्द करणे असे निर्णय घेऊन त्यांनी खळबळ उडवून टाकली त्यांच्या या धाडसी निर्णयाला अनेकांनी विरोध केला पण आपल्या निर्णयापासून त्या



तसूभरही मागे हटल्या नाही. १९७१ साली झालेल्या मुदतपूर्व निवडणुका त्यांनी एकहाती जिंकल्या. यानिवडणुकीत त्यांनी गरिबी हटाव ही घोषणा दिली. त्यांची ही घोषणा खुप गाजली. गोरगरिबांनी त्यांना भरभरुन मते दिली. याचवेळी पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान यांच्यात मोठा संघर्ष सुरू झाला. पूर्व पाकिस्तानातून एक कोटी निर्वासित भारतात आले. त्यामुळे अर्थव्यवस्थेवर ताण पडला. पूर्व पाकिस्तानला भारत मदत करीत आहे म्हणून पश्चिम पाकिस्तानने भारताविरुद्ध युद्ध पुकारले. अमेरिकेने भारताला धमकी देत त्यांचे सातवे आरमार बंगालच्या उपसागरात पाठवले पण त्या घाबरल्या नाहीत त्यांनी जनतेला आणि सैनिकांना विश्वास दिला या विश्वासाच्या जोरावरच भारताने पाकिस्तानचा दारुण पराभव केला आणि बांगलादेश नावाचे नवे राष्ट्र उदयास आणले. पाकिस्तानचे एक कोटी सैनिक भारताला शरण आले. यावेळी त्यांनी दाखवलेल्या धाडसाची आणि नेतृत्वगुणाची जगाने दखल घेतली. जागतिक राजकारणातील एक सामर्थ्यशाली नेत्या म्हणून त्या उदयास आल्या. देशातही त्यांची लोकप्रियता शिखरास पोहचली. विरोधी पक्षनेते अटल बिहारी वाजपेयी यांनी त्यांना दुर्गेची उपमा दिली. १९७५ साली त्यांनी सिक्कीमचे भारतात विलीनीकरण केले तर १९७६ साली अणुस्फोट करुन देशाला अणुऊर्जेत स्वयंपूर्ण बनवले. २६ जून १९७५ रोजी त्यांनी देशावर लादलेली आणीबाणी मात्र लोकांना रुचली नाही त्यामुळे १९७७ साली झालेल्या निवडणुकीत त्यांना पराभव स्वीकारावा लागला पण तीन वर्षाने १९८० साली त्या बहुमताने विजयी झाल्या. १९८४ साली पंजाबमधील पवित्र सुवर्ण मंदिरात खलिस्तानवादी अतिरेकी ठाण मांडून बसले होते. देशाची दुसरी फाळणी करुन स्वतंत्र खलिस्तान देश निर्माण करणे ही त्यांची मागणी होती त्यांचा जर लवकर बिमोड केला नाही तर देशाच्या सार्वभौमत्व आणि अखंडतेला मोठा धोका आहे हे ओळखून या अतिरेक्यांना सुवर्ण मंदिरातून हुसकावून लावण्यासाठी ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहीम राबविण्याचा निर्णय त्यांनी घेतला. हा निर्णय घेऊ नये असा सल्ला त्यांना अनेकांनी दिला या मोहिमेमुळे अतिरेकी त्यांचा जीव घेण्यासही मागे पुढे पाहणार नाहीत असा सल्ला त्यांना अनेकांनी दिला पण देशाच्या अखंडतेसाठी त्यांनी हा निर्णय घेतला. सुवर्ण मंदिरात ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहीम राबवून अतिरेक्यांना बाहेर काढण्यात आले. अनेक अतिरेक्यांचा खात्मा करण्यात आला. भिंद्रनवाले हा अतिरेकी या कारवाईत मारला गेला. या मोहिमेने दुखावलेल्या त्यांच्या अंग रक्षकानींच ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांच्यावर गोळीबार केला त्यात त्यांचा दुःखद अंत झाला. त्यांच्या मृत्यूने भारतातच नव्हे जगात शोककळा पसरली.

# महान व्यक्तिमत्त्वाची गौरवगाथा ग्रामगीतेचे अंतरंगात



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगे महाराज हे विदर्भभूमीतील दोन आधुनिक विज्ञानवादी संत होत. तुकडोजी महाराजांची ग्रामगीता म्हणजे खऱ्या अर्थाने सर्वसामान्य माणसाला जीवन मार्गावर यशस्वी वाटचाल करण्यासाठी उभा असलेला दीपस्तंभ होय. या ग्रामगीतेवर अनेकांनी विविध पैलूंनी लिखाण केले आहे. असेच ग्रामगीतेच्या अंतरंगात शिरून डॉक्टर नंदकिशोर भाऊराव काळे यांनी ग्रामगीतेच्या अंतरंगात या महत्त्वाच्या ग्रंथाची निर्मिती केली आहे. ग्रामगीता या ग्रंथात राष्ट्रसंत तुकडोजी यांनी ज्या विविध संतांच्या आणि समाज सुधारकांच्या कार्याचे गुणगौरव करून वेळोवेळी जे उदाहरणे आणि दाखले दिले आहेत त्या सर्व व्यक्तिमत्त्वांचा आणि तुकडोजींनी त्यांच्याबद्दल काढलेल्या गौरव उद्गारांचा एकत्रित आढावा घेऊन त्याबद्दल विवेचन करण्याचे काम नंदकिशोर काळे यांनी केले आहे.**

ग्रामगीतेत आलेल्या 40 संत सRपुरुष, समाज सुधारक, तत्वज्ञ यांच्यासह प्रत्यक्ष तुकडोजी महाराजांवर एक असे 41 व्यक्तिमत्वावर अभ्यासपूर्ण विवेचन करण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला दिसून येतो. ग्रामगीतेतील तत्त्वज्ञान समजून घेऊन त्यातील महापुरुषांच्या विचारांचा आढावा घेऊन त्यावर विवेचन करताना नंदकिशोर काळे यांच्यावरील गुरुदेव सेवा मंडळाचा शिस्तबद्ध संस्कार असल्याचे दिसून येते. त्यामुळेच इतर 40 महापुरुष आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार यांचा समन्वय साधत लेखक व्यक्त होत राहतात मात्र कुठेही त्यांचे आपसात तुलना करून कुणा एकाचा मोठेपणा आणि दुसऱ्याची किंचितही मानहानी त्यांच्या लेखणीतून होत नाही. तुकडोजी महाराज यांनी जात, धर्म , पंथ, भाषा याच्या पलीकडे जाऊन आपला विचार समाज हितासाठी मांडला, ते करत असताना त्यांनी दिलेले विविध दाखले आणि तत्वे याबाबत तेवढ्याच आत्मीयतेने विवेचन करून लेखकाने सांगितले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना आरोग्य, कृषी या विषयाचे ज्ञान होते. महाराजांची निरीक्षण क्षमता चांगली असून त्यांच्याकडे दृष्टांत शैली होती. विचारांमध्ये सर्वसमावेशक विचार होता असे सांगून राष्ट्रसंत तुकडोजींचा गौरव नंदकिशोर काळे यांनी केला आहे. इतर लेखांमध्ये समर्थ रामदास यांनी 400 वर्षापूर्वी पाण्याचे महत्व विशद केले होते हे सांगून आज महाराष्ट्रातील जल व्यवस्थापन आणि जलसंवर्धनाची परिस्थिती पाहता मन हेलावून जाते असे लेखक म्हणतात आणि त्याच वेळी नदीतील पाण्याला पवित्र पापनाशक म्हणत अन्न निर्मितीसाठी सुद्धा त्याची उपयुक्तता आहे असे रामदासांनी सांगितले होते. हे आपल्या लक्षात येते. स्वामी रामानंद तीर्थ, आचार्य विनोबा भावे, महात्मा ज्योतिराव फुले अशा आधुनिक समाज सुधारकांच्या विचारावर राष्ट्रसंतांनी केलेले भाष्य नेमकेपणाने टिपून त्यावर नंदकिशोर काळे यांनी आपले मत मांडले आहे. महात्मा फुले यांनी शेतकऱ्याचा आसूड पासून सार्वजनिक सत्यधर्म पर्यंत केलेल्या सर्व कार्याची दखल राष्ट्रसंतांनी घेतली होती यावर लेखकाने प्रकाश टाकला आहे. भगवान गौतम बुद्ध यांची शिकवण लक्षात घेऊन राष्ट्रसंत तुकडोजींनी सामुदायिक ध्यानाच्या माध्यमातून शरीर, मन, शुद्ध होते आणि मनाला स्थिरता मिळते हाच दुःखमुक्तीचा मार्ग आहे असा संदेश आपल्या शिष्यगणांना दिला होता असे लेखक सांगतात. 2500 वर्षांपूर्वी गौतम बुद्धांनी शोधून काढलेला मार्ग फक्त भिक्षू साठीच मर्यादित नसून तो सर्वांसाठी आहे हा राष्ट्रसंतांचा विचार सुद्धा लेखकाने अधोरेखित केला आहे. भगवान महावीर यांच्या धाम या माध्यमातून समता, मैत्री, शांत भाव अंगी बाळगुन सम्यक आचार सम्यक विचार व आदर्श असा संयम ठेवून भवसागर तथा संसार सागर पार करून जाण्यासाठी मानव जातीला आत्मकल्याणाचा मार्ग राष्ट्रसंतांनी सांगितला असे नमूद करत नंदकिशोर काळे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जीवनातील सर्वधर्मसमभाव अधोरेखित केला आहे. त्याचप्रमाणे कोणत्याही महापुरुषाला एका जातीपुरते बंदिस्त करणे योग्य नव्हे असे सुद्धा ते सांगण्याचा प्रयत्न करतात. गुरुनानक यांच्या गुरु ग्रंथ साहेब या ग्रंथाला गुरु मानून अकाल पंथ चालवावा असा आदेश होता, याची जाणीव ठेवून राष्ट्रसंत श्रमसंपत्ती महत्त्व प्रतिपादन करून कामालाच ईश्वर मानण्याचा आग्रह धरतात असे सुद्धा आपल्या निरीक्षण क्षमतेतून नंदकिशोर काळे सांगतात. गुरू गोविंदसिंग यांचा लहरा की बरखा मध्ये असलेला संदर्भ, तुकडोजी महाराजांचा तुकाराम महाराजांवर असलेला भक्तिभाव, तुकडोजींचे समकालीन गाडगे महाराज यांचा सुद्धा राष्ट्रसंतांनी केलेला गौरव, गाडगे महाराजांनी दिलेला स्वच्छतेचा मंत्र तसेच त्यांनी दिलेला दशसूत्री कार्यक्रम हाच खरा धर्म आहे लेखक आवर्जून सांगतात. चक्रधरस्वामी, श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी, संत गोरा कुंभार, संत सावता माळी, संत एकनाथ महाराज यांच्यासह कबीरदास, अश्या सुधारणावादी विचारांच्या संतांचा आणि त्यांच्या विचाराचा राष्ट्रसंतांनी केलेला सन्मान लेखकाने यथोचित शब्दात सांगितला आहे. भगवान गौतम बुद्ध, भगवान महावीर, येशू ख्रिस्त, आद्य शंकराचार्य, गुरुनानक या धर्म संस्थापकांनी दिलेला धर्म हा मानवता धर्म होता आणि त्याचेच पालन झाले पाहिजे असा विचार राष्ट्रसंतांचा होता असे आपल्याला वरील धर्म संस्थापकांचे लेखकाने लिहिलेले व्यक्तिमत्वावरील लेख वाचताना लक्षात येते. महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद, तुकडोजी महाराजांचे गुरु आडकोजी, महाराज योगी अरविंद, स्वामी रामकृष्ण परमहंस , लोकमान्य टिळक, स्वामी दयानंद सरस्वती, साने गुरुजी, विनोबा भावे आणि महात्मा ज्योतिबा फुले अशा अगदी अलीकडच्या काळातील समाजसुधारकांना या समाजाच्या परिवर्तनाचे शिलेदार म्हणून राष्ट्रसंतांनी सदैव आपल्या भजनातून, कीर्तनातून आणि ग्रामगीतेतून गौरविले आहे या बाबत सुद्धा नंदकिशोर काळे यांनी आपले विवेचन सिद्ध केले आहे. मायबाई श्रीमंजुळादेवी तसेच भक्तीमती मीराबाई अशा फक्त दोनच स्त्रियांवरचे लेख या ग्रंथात आढळून येतात. तसे पाहता स्त्रियांवर किंवा स्त्री शक्तीवर राष्ट्रसंतांनी भरभरून आपली मते व्यक्त केली आहेत त्याबाबत दुर्लक्ष होता कामा नये असे मला वाटते. डॉक्टर नंदकिशोर काळे हे वैद्यकीय पेशातील डॉक्टर आहेत त्यामुळे लालित्यपूर्ण साहित्याचे मांडणी न करता त्यांनी त्यांच्या व्यावसायिक स्वभावानुसार चिकित्सा पद्धतीने ग्रामगीतेचा अभ्यास केलेला दिसून येतो. ग्रामगीतेच्या अंतरंगात ह्या ग्रंथाचे मुखपृष्ठ म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची भाव गंभीर मुद्रा असलेला फोटो आहे. ज्ञानपथ पब्लिकेशन, अमरावती यांनी हा सुंदर ग्रंथ प्रकाशित केला असून या ग्रंथाचे अर्पण पत्रिका राष्ट्रसंत तुकडोजींचा सर्व ग्रामासी सुखी करावे हा अभंग आहे. JH- प्रकाश वाघ, JH- जनार्धन बोथे, JH- आचार्य हरिभाऊ वेरुळकर, डॉक्टर सूर्यप्रकाश जयस्वाल डॉक्टर LQFUY बोरकर अशा गुरुदेव सेवा मंडळाशी संबंधित असलेल्या आणि निस्पृह व्यक्तिमत्वाच्या आणि विचारांचा वारसा लाभलेल्या जाणकारांचे अभिप्राय या संग्रहाची उंची वाढवणारे आहेत. या संग्रहावर कितीही बोलले तरी ते कमी पडत राहणार करिता हा संग्रह मुळातून वाचून व आपल्या ह्रदयात जाताना करून ठेवावा असा आहे. साहित्यिक अंगाने हे सर्व लेख विविध उदाहरणासह, दृष्टांत आणि दाखले सह विस्तृत केले असते तर त्यामध्ये डॉक्टर नंदकिशोर काळे यांची वैचारिक बैठक लक्षात आली असती आणि लेखांचे स्वरूप लघू न होता विस्तृत VLSS लेख आले असते तर आणखी परिणामकारक झाले असते असा मित्रत्वाचा सल्ला नंदकिशोर काळे यांना द्यावासा वाटतो. डॉक्टर नंदकिशोर काळे यांच्या भावी लेखनीतून अजून प्रचंड प्रतिभा झिरपत राहील या सदिच्छा सह त्यांना खूप खूप शुभेच्छा!

# लोहा कंधार तालुक्यातील सोयाबीन पिवळा मोझेक रोगामुळे बाधित

## सोयाबीनचे पंचनामे करून तत्काळ अहवाल शासनास पाठवावा : आमदार श्यामसुंदर शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** कंधार तालुक्यातील खरीप हंगामातील सोयाबीनच्या पिकावर पिवळा मोझेक हा विषाणूजन्य रोग आणि खोडकूज व मुळकुज या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव झालेल्या क्षेत्राचे संयुक्त पंचनामे करण्यासाठी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी आदेशित केले होते.

हे पंचनामे करण्यासाठी गावचे तलाठी ,कृषी सहाय्यक व ग्रामसेवक यांनी बाधित सोयाबीन नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून तात्काळ अहवाल सर्वेक्षिकामार्फत सात दिवसात सादर करण्याचे निर्देशही दिले होते, पण पिवळा मोझेक मुळे सोयाबीन बाधित पिकांच्या पंचनाम्याचे अहवाल वेळेत सादर न झाल्यामुळे लोहा कंधारचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष आमदार शामसुंदर शिंदे यांनी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची त्यांच्या दालनात भेट घेऊन बाधित सोयाबीन पिकांच्या पंचनाम्याचा अहवाल शासनाला तातडीने पाठवून पिवळा मोझेक रोगामुळे बाधित सोयाबीन शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करण्याची मागणी यावेळी आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची त्यांच्या दालनात भेट घेऊन केली आहे. यावेळी विशाल कौशल्य, सचिन कुदळकर, दत्ता शिंदे दहीकळंबेकर ,अशोक बोधगिरे सह पदाधिकारी उपस्थित होते, यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी पिवळा मोझेक रोगामुळे लोहा कंधार तालुक्यातील बाधित सोयाबीन शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत केली जाईल असे आश्वासन यावेळी आमदार शामसुंदर शिंदे यांना दिले आहे.





# स्वागताध्यक्षपदी ॲड. कृष्णा जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यात साहित्यिक व सांस्कृतिक चळवळ गतिमान व्हावी, नव्या पिढीतील कविंना हक्काचे व्यासपीठ मिळून लिहिण्यासाठी प्रेरणा मिळावी तसेच वाचन संस्कृती वृद्धिंगत होऊन उत्तमोत्तम साहित्यिक घडावा , विवेकी व सुसंस्कृत समाज घडावा या उद्देशाने त्रैमासिक तिफण, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड आणि शिवाजी महाविद्यालय कन्नडच्या मराठी विभागाच्या पुढाकारातून दरवर्षी राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त कन्नड तालुक्यात ग्रामीण भागात राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. कविता महोत्सवाचे हे सहावे वर्ष असून या वर्षीचा कविता महोत्सव तालुक्यातील पिशोर येथे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात होणार आहे. कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात साहित्यिकांची बैठक प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. रमेश सूर्यवंशी, डॉ. प्रतिभा अहिरे, प्रा. रंगनाथ लहाने, कविता महोत्सवाचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. के.एल. भानुसे , प्रविण दाभाडे, ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, अमोल मोकासे यांच्या उपस्थितीत नुकतीच संपन्न झाली. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून स्वागताध्यक्षपदी ॲड. कृष्णा जाधव यांची निवड करण्यात आली आहे. पिशोर हे तालुक्यातील मोठे गाव असून येथे हिराजी बाबा यांचे मंदिर आहे. अतिशय पुरातन ऐतिहासिक, धार्मिक परंपरा लाभली असून साहित्यिक परंपरा लाभलेली आहे. अंजना सागर हे मोठे धरण ही येथे आहे. नाटय परंपराही या गावाला लाभली आहे. येथे गुळाचे अनेक युनिट असून येथील गुळ प्रसिद्ध आहे. शेती व्यावसायात नवनविन प्रयोग करणारे नामवंत शेतकरी या पंचक्रोशित आहे. राजकीय , सामाजिक चळवळीची पार्श्वभूमी ही लाभलेली आहे.अँड. कृष्णा जाधव हे पिशोर गावचे मूळ रहिवाशी असून कन्नड येथे न्यायालयात विधिज्ञ म्हणून कार्यरत आहे. सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते म्हणूनही त्यांचा लौकिक आहे. त्यांना साहित्याची व सामाजिक कार्याची आवड असून विविध राजकीय पक्षांची पदे त्यांनी भूषविलेली आहे. सहकार क्षेत्रातही महत्वाचे योगदान दिले आहे. तिफण कविता महोत्सवाच्या सल्लागार व संयोजन समितीचे ते मार्गदर्शक आहेत. कन्नड तालुक्यात साहित्य चळवळ वाढावी यासाठी ते प्रेरणा देतात. विविध उपक्रमात सहभागी होतात.





# कन्नडच्या सोळा गावाला तातडीने कुणबी प्रमाणपत्र दयावे अन्यथा तीव्र आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील सोळा ( 16 ) गावे ब्रिटिश राजवटीतील असुन आता पर्यत कुनबी प्रमाणपत्रा पासुन वंचीत आहेत त्यांना तातडीने कुनबी प्रमाणपत्र देण्यात यावे, असे निवेदन जिल्हा परीषद सदस्य किशोर पवार व सुभाष काळे अन्य मराठा बांधवांनी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड तसेच तहसीलदार विदयाचरण कडवकर यांना निवेदन गावाची यादी, जिल्हा गॅझेट कॉपी, नकाशा प्रत, इत्यादी पुरावे देण्यात आले आहे.

ब्रिटिश राजवटीतील सोळा मैलावरील गावे कुणबी म्हणून सामाविष्ट केले आहे. त्यात कन्नड तालुक्यातील सुमारे सोळा गावाचा सामावेश आहे. मात्र आतापर्यत कन्नड तालुक्याती गावे कुणबी प्रमाण पत्रापासुन वंचीत आहे त्यांना कुणबीचे प्रमाण पत्र दयावे यासाठी जिल्हा परीषद सदस्य किशोर पवार मराठा बांधवानी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड तसेच तहसीलदार विदयाचरण कडवकर यांना पुरावे देण्यात आले आहे. त्या ध्ये या गावाचा सामावेश आहे. चिकलठाण, हातनुर, रेल, नरसिंगपूर, मक्रणपुर,चापानेर, जळगाव घाट ,जामडी घाट ,वडाळी, बोरसर खुर्द, नागद, बेलखेडा, हसनाबाद, वडगाव, पांगरा, सायगव्हान असे सोळा गावे हे कुणबी असून मात्र कित्येक वर्षापासून कुनबी प्रमाण पत्रा पासुन वंचित आहे. याकडे शासन तात्का लक्ष देऊन सोळा गावातील नागरीकांना कुनबी प्रमाण पत्र तातडीने दयावे, असे निवेदन तसेच पुरावे देण्यात आले आहे.

# राज्यात छावा क्रांतिवीर सेना पुन्हा मैदानात उतरणार..!

## समर्थकांच्या मेळाव्यात गायकर यांची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** जवळपास दहा-बारा वर्षांपासून संघटनात्मक चळवळीत अग्रेसर व युवकांच्या गळ्यातील ताईत बनलेली आणि गेल्या जानेवारी महिन्यात स्वराज्य संघटनेत विलीन करण्यात आलेली छावा क्रांतिवीर सेना पुन्हा एकदा कार्यान्वित करण्यात आली आहे. वर्षभरातच 'स्वराज्य'च्या संपर्कप्रमुख पदाचा राजीनामा देवून बाहेर पडलेल्या करण गायकर यांनी रविवारी (दि.२९) घेतलेल्या समर्थकांच्या मेळाव्यात याबाबतची घोषणा केली आहे. तसेच मराठा आरक्षणासाठी मराठा योद्धा जरांगे पाटील यांच्या समर्थनात सोमवारपासून (दि.३०) राज्यभरात छावा क्रांतिवीर सेना रस्त्यावर उतरणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. या निमित्ताने छावा क्रांतिवीर सेना पुन्हा एकदा राज्य राज्यभरात मराठा आरक्षण हा मुद्दा व जरांगे पाटील यांच्या साठी मैदानात उतरणार आहे.




'स्वराज्य'मधून बाहेर पडल्यानंतर पुढची दिशा ठरविण्यासाठी करण गायकर यांनी समर्थकांचा नुकताच मेळावा घेतला. मेळाव्यासाठी नाशिकसह नांदेड, छत्रपती संभाजी नगर,पुणे, अहमदनगर, बीड सोलापूर, सांगली, जळगाव, जालना, ठाणे, धाराशिव, परभणी, धुळे, लातूर, परभणी, रायगड आदी जिल्ह्यातील समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी समर्थकांनी आपल्या भावना व्यक्त करीत, छावा क्रांतिवीर सेना पुन्हा कार्यान्वित केली जावी, अशी एकमुखी मागणी केली. त्यावर करण गायकर यांनी १ जानेवारी २०२४ रोजी संघटनेचे भव्य अधिवेशन आयोजित करून संघटनेच्या महाराष्ट्रासह इतर राज्यात पसरविण्यासाठी जोमाने कार्य करणार असल्याचा निर्धार व्यक्त केला. गायकर म्हणाले, 'छावा क्रांतिवीर सेना स्वराज्यमध्ये विलीन करताना राज्यभरातील तमाम सहकार्यांना स्वराज्यमध्ये न्याय देणार असल्याचा मी शब्द दिला होता. परंतु, त्यास मी अपयशी ठरत असल्याचे दिसून आल्यानंतर मी स्वराज्यमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. गेल्या वर्षभरात काय घडले यावर चर्चा न करता संघटनेचे वादळ राज्यभर निर्माण करणार आहे. यावेळी गायकर यांनी टीकाकारांचा समाचार घेताना म्हटले, 'मी शांत आहे म्हणजे संत नाही. मी बोलत नाही म्हणून अनेकजण मी चुकल्याचा प्रचार करीत आहे. माझ्यावर आरोप करीत आहेत. मात्र, मी शांततेने कामातून उत्तर देणार आहे. तसेच आम्हाला कोणी निष्ठा शिकविण्याचा प्रयत्न करू नये. युवराज संभाजी राजे यांच्याविषयी आजही मनात निष्ठा असून, संघटना सोडली म्हणजे छत्रपतींना सोडले असे होत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान,'नवे पर्व, नवे ध्यये, नव्या संकल्पाची वादळवाट' ही टॅगलाइन घेवून संघटना मैदानात उतरणार आहे.

**मराठा आरक्षणासाठी रस्त्यावर**

मराठा आरक्षणासाठी मैदानात उतरलेले मनोज जरांगे-पाटील यांच्या समर्थनार्थ छावाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी रस्त्यांवर उतरावे, प्रत्येक जिल्ह्यात आंदोलन उभे करावे, असे आवाहनही गायकर यांनी समर्थकांना केले .मराठा आरक्षण प्रश्नी सरकारने दाद द्यावी,अन्यथा छावा क्रांतिवीर सेना मंत्रालय गाठेल असा इशाराही त्यांनी याप्रसंगी दिला . तसेच पुढील काळात पुण्यातील शेतकऱ्यांसाठी व नागपूरमध्ये रोजगार हमी योजनेच्या संदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घरासमोर छावा क्रांतिवीर सेना आंदोलने करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले .

**...तर नेत्यांना घरबंदी करू**

मराठा आरक्षणावरून राज्यभरात नेत्यांना गावबंदी केली जात आहे . मराठा आरक्षणावर तोडगा न निघाल्यास छावा क्रांतिवीर सेना नेत्यांना घरबंदी करेल असा इशाराही गायकर यांनी दिली .




# मराठा आरक्षण समर्थनात ठराव पास करण्याची केली मागणी

## सत्यशोधक बहुउद्देशीयचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या वतीने मांडकी,ता.पुरंदर, जि.पुणे येथील ग्रामपंचायतीस एक निवेदन देण्यात आलेले आहे.मराठा आरक्षणाच्या समर्थनात ठराव पास करण्याची मागणी मांडकी गावचे सरपंच आणि ग्रामसेवक यांच्याकडे करण्यात आलेली आहे. सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विशाल धेंडे,उपाध्यक्ष सुरेश गायकवाड,सचिव राहुल गायकवाड,कार्याध्यक्ष संभू कांबळे,खजिनदार मिलिंद कांबळे, प्रवक्ते महादेव राजमाने,संघटक प्रचारक राहुल इंगोले आदी पदाधिकारी सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे कार्य करत असून संस्थेच्या वतीने ही मागणी निवेदनातून करण्यात आलेली आहे.

दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की,लोकशाही भारत देशात लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व करण्याचा अधिकार भारतीय संविधानात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला आहे.

तो अधिकार प्रत्येक जाती समुहांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मिळावा व कोणावरही अन्याय होऊ नये यासाठी भारत देशातील सर्व नागरिकांची जातवार जनगणना करून १००% आरक्षण लागू करुन जाती समुहांच्या टक्केवारीच्या प्रमाणात त्या-त्या जात समुहांना प्रतिनिधित्व करण्यासाठी आरक्षण देण्यात यावे. मराठा ही जात नसुन प्रदेशवाचक शब्द आहे आणि सर्व मराठा हे जातीने कुणबी आहेत त्यामुळे एकतर त्यांना त्यांचा स्वतंत्र प्रवर्ग बनवून त्या प्रवर्गाच्या टक्केवारीनुसार आरक्षण देण्यात यावे. किंवा तसे शक्य नसल्यास मराठा-कुणबी यांना इतर मागास वर्ग (ओबीसी) मध्ये सहभागी करुन जातवार जनगणना करून त्या प्रवर्गाच्या टक्केवारीनुसार आरक्षण लागू करावे अशी मागणी राज्यशासन आणि केंद्रशासन यांच्याकडे ग्रामपंचायत मांडकीच्या वतीने करण्याचा ठराव आपल्या ग्राम- पंचायतीने करून तसा ठराव झाल्याचा पत्रव्यवहार राज्यशासन आणि केंद्रशासन यांच्याकडे करून सदर मागण्यांची पुर्तता करण्याची विनंती करावी.असे म्हटले आहे.पुढे असे म्हटले आहे की,१००% आरक्षण लागू केल्यास सर्व जात समुहांना लोकसंख्येच्या टक्के - "वारीच्या प्रमाणात प्रतिनिधीत्वाचा अधिकार मिळेल.सर्व नागरिकांची जातवार जनगणना केल्यामुळे जात प्रवर्गाच्या 'लोकसंख्येच्या टक्केवारीच्या प्रमाणात प्रतिनिधीत्वाचा अधिकार (आरक्षण) देण्याचा मार्ग मोकळा होईल.



# सहाव्या दिवशी गणोरीत उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील गणोरी सर्कल मध्ये 25 ऑक्टोंबरपासून बेमुदत साखळी उपोषणास सुरुवात झाली आहे सलग सहाव्या दिवशी मोठ्या संख्येने मराठा समाजातील नागरिक उपस्थित होते. आरक्षण मराठा समाजास आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे काय पुन्हा आमरण बसले आहे त्यांना पाठिंबा म्हणून गणोरी सर्कल मधील गावांनी साखळी उपोषण सुरू केले आहे. या सर्कल मधील गणोरी, चिंचोली,बिल्दा, सांजुळ, विटेकर वाडी, गणेश पुर, जानेफळ, किनगाव या गावांमधील सकल मराठा समाज मोठ्या संख्येने दररोज आपल्या ठरून दिलेल्या वेळात साखळी उपोषणास उपस्थित होत असतात.

# ममुराबाद -जानेफळ, शेलगाव तंटामुक्ती अध्यक्षपदी जावेद पटेल

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील जानेफळ, शेलगाव व ममुराबाद ग्रामपंचायती अंतर्गत ममुराबाद येथील सुपुत्र तथा खुलताबाद तालुक्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष जावेद बशीर पटेल यांची काल दिनांक 30 ऑक्टोंबर रोजी जानेफळ शेलगाव व ममुराबाद गावाच्या महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली असून तर उपाध्यक्ष पदी नवनाथ वाघदरे यांची ही बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यक्षपदी निवडी प्रसंगी ग्रामसेवक अंतरवाळे यांनी काम पाहिले.

यामध्ये निवड झाल्याबद्दल जानेफळ शेलगाव व ममुराबाद ग्रामपंचायतीच्या सरपंच भागुबाई अटुळे, उपसरपंच कृष्णा गावंडे, माजी सरपंच अप्पासाहेब वेताळ, माजी सरपंच मुनीर पठाण, ग्रामपंचायत सदस्य दाऊद पटेल, जनार्दन वेताळ, वि.वि.का. सोसायटीचे चेअरमन रऊफ पटेल यांनी त्यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी ममुराबाद शालेय शिवाजी जेठे विविध कार्यकारी सोसायटी सदस्य



व्यवस्थापन समिती अध्यक्ष ताहेर पटेल, अंबादास जाधव, इम्रान पठाण, अरुण अधाने, नाजेर पटेल, सुधाकर जेठे दैनिक आधुनिक केसरी जिल्हा ग्रामीण प्रतिनिधी, पत्रकार सरफराज पटेल, लक्ष्मण घायाळ, बाळु बनसोड, अकील पटेल, पोलीस पाटील अमीन सय्यद, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस तालुका कार्याध्यक्ष इरफान पठाण, नबी पटेल, पाशु शहा, बबन गायकवाड, तोफीक सय्यद यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# ओबीसी समाज धर्मांतरित झाला

## डॉ.भीमराव आंबेडकर : मराठवाड्यात हजारो मातंग बांधव बौद्ध धर्मांतरित

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** भारतीय बौद्ध महासभे मार्फत बाबासाहेबांची धम्मचळवळ महाराष्ट्रातच नाही तर देशाच्या काना कोपऱ्यात नेहण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील फुले, शाहू, आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज कुठल्याच महापुरुषाला मी एखाद्या जाती धर्मामध्ये व एखाद्या प्रदेशात बांधून ठेवत नाही. खरं परिवर्तन हे उत्तर भारतामध्ये सुरू झालेलं आहे. मागच्या दोन महिन्यापूर्वी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने उत्तर प्रदेश मध्ये पावसाळ्याच्या दिवसामध्ये पाच अधिवेशने घेतली. ती अधिवेशने ओबीसी समाजाची होती. मोठ्या संख्येने ओबीसी समाज त्याच्यात धर्मांतरित झाला.पावसामध्ये देखील २२ प्रतिज्ञा त्रिशरण, पंचशील घेऊन ते धर्मांतरित झाले. हे सर्व ओबीसी समाजाचे लोकं आहेत. जे आपण महाराष्ट्रात धर्मांतरित झालो तो महार समाज फक्त महाराष्ट्रामध्ये आहे. तर तेथे हे धर्मांतरित होणारे हा कुशवाह समाज आहे. सैनी समाज आहे. मौर्य समाज आहे.आपले काही पदाधिकारी उत्तर भारतातील सुध्दा मौर्य समाजाचे आहेत. मौर्य हे आडनाव लावणारे आहेत. असे लोकं धर्मांतरित झाली आहेत, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू डॉ.भीमराव यशवंतराव आंबेडकर यांनी म्हटले. तसेच १५ दिवसापूर्वी राजस्थानच्या जयपूर मध्ये साडे सात हजार लोकांनी, भारतीय बौद्ध महासभेने दीक्षा प्रमाणपत्राचं वाटप केलं असल्याचे सुद्धा डॉ.भीमराव आंबेडकरांनी लोणंदच्या धम्मपरिषदेतून सांगितले.ते लोणंद (ता.खंडाळा) येथे पंचशील बुद्धविहारासमोर शुक्रवार दि.२७ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य धम्मपरिषद व धम्मदीक्षा समारंभ कार्यक्रमातून बोलत असताना महाराष्ट्रच नव्हे तर देशाच्या विविध भागातून लोकं कशी बौद्ध धर्मांतरित होत आहेत. याचे दाखले दिले. यावेळी पूज्य भन्ते धम्मानंद बोधी, भारतीय बौद्ध महासभेचे सातारा जिल्हा पूर्व अध्यक्ष



श्रीमंत घोरपडे, लोणंदच्या नगराध्यक्षा सिमा खरात, खंडाळा तालुकाध्यक्ष यशवंत खुंटे व भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, समता सैनिक दल, श्रामणेर संघ, बौद्धाचार्य, केंद्रीय शिक्षक-शिक्षिका व उपस्थित असलेले बौध्द उपासक व उपासिका मोठया संख्येने उपस्थित होते. ह्या परिषदेचे आयोजन भारतीय बौद्ध महासभा, दर रविवारी चला बुद्ध विहारी वंदना मैत्री संघ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती,माता रमाई महिला मंडळ यांच्या वतीने करण्यात आले होते.तसेच ही धम्म परिषद संपन्न होण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकाऱ्यांनी व लोणंद कर बौध्द उपासक व उपासिकांनी विशेष मेहनत घेतली. भिमराव आंबेडकर म्हणाले की,बाबासाहेब त्या काळात दोन परिषदा घेत होते. एक मातंग परिषद आणि दुसरी महार परिषद होती.बाबासाहेबांच्या कार्यक्रमांचा आलेख जर बघितला तर बाबासाहेब हे महाराष्ट्रच नाही तर देशाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहचले होते. लोकांमध्ये जागृती व्हावी, लोकांना प्रबोधन कळावं, लोकांना सामाजिक क्रांतीतून धार्मिक क्रांती मध्ये प्रवृत्त करावं,यासाठी बाबासाहेबांच्या त्या परिषदांचं आयोजन करण्यात आलं होतं.मध्यंतरी मला मराठवाड्यामध्ये मातंग समाजाकडून बोलविण्यात आलं. हजारो मातंग बांधव बौद्ध धर्मांतरित झाले. मी खूप मोठी चळवळ या महाराष्ट्रामध्ये चर्मकार आणि मातंग समाजा मध्ये बघितली. ते आपले बांधव आहेत, असे सुद्धा भिमराव आंबेडकर यांनी सांगितले.

# राज्यासह देशात गुलाबी थंडी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** दक्षिणेकडील राज्यांमध्ये मुसळधार पाऊस सुरू आहे, तर जम्मू-काश्मीर, लेह, लडाख, उत्तराखंड, हिमाचल प्रदेशमध्ये बर्फवृष्टीचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. महाराष्ट्रात किमान तापमानात घट होऊ लागल्याने गुलाबी थंडीची चाहूल लागली आहे.
येत्या काही दिवसात राज्यात किमान तापमानात हळूहळू आणखी घट होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. राज्यातील काही भागात पावसाची शक्यताही वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, राज्यातील इतर भागात गारठा वाढत असून मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात थंडी वाढू लागली आहे. उत्तर प्रदेशमध्येही तापमानात हळूहळू घट होत आहे. यासोबतच नोव्हेंबर महिना सुरू होताच धुकेही वाढणार आहे. डोंगराळ भागात जोरदार बर्फवृष्टी होत आहे. याशिवाय उत्तराखंडसह जम्मू-काश्मीर, लेह, लडाख आणि हिमाचल प्रदेशातही बर्फवृष्टी होण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार २९ ते ३० ऑक्टोबर दरम्यान तामिळनाडू आणि केरळमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.
३० आणि ३१ ऑक्टोबरला दक्षिण कर्नाटकात अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.



# जिंतूरात आरक्षणासाठी उपोषणास सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरांगे पाटील मागील चार दिवसांपासून आमरण उपोषणास बसले आहेत म्हणून शहरात सकल मराठा समाजाने चार दिवस साखळी उपोषण केले होते मात्र त्याच साखळी उपोषणाचे रूपांतर आमरण उपोषणात केले आहे दिनांक 29 ऑक्टोबर पासून तिघेजण आमरण उपोषणास बसले आहेत. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी राज्यात विविध प्रकारचे आंदोलन करण्यात येत आहे. यामध्ये राजकीय नेत्यांना गाव बंदी, शासनाच्या निषेधार्त मशाल रॅली, कॅंडल मार्च, तर गावागावात साखळी उपोषण करण्यात येत आहे. मात्र अद्याप मराठा आरक्षणाचे राज्य सरकारने भिजत धोंगडे कायम ठेवल्यामुळे मराठा




समाज आक्रमक होत असल्याचे दिसून येत आहे. शहरातील तहसील परिसरात सकल मराठा समाजाचे साखळी उपोषण सुरू होते त्याचे आमरण उपोषणात रूपांतर करण्यात आले. उपोषणास बालाजी शिंदे, पंढरीनाथ शिंदे, विलास रोकडे यांनी आज पासून आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. दरम्यान उपोषण कर्त्यांना पाठिंबा देण्यासाठी तालुक्यातील सकल मराठा समाजातील नागरिक उपस्थित राहत आहेत.

# वाहनासह पकडला १९ लाखांचा गुटखा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी.रामपूरकर**

**जिंतूर :** जिंतूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिरुद्ध काकडे यांनी तालुक्यातील गुटखा माफियावर कारवाई करत, वाहनासह एकूण १९ लाख ६० हजाराचा गुटखा दि २९ रोजी रात्री पकडला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, जिंतूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिरुद्ध काकडे हे आपल्या सहकाऱ्यांसोबत शनिवारी रात्र गस्तीवर असताना त्यांना गुप्त बातमीदारांमार्फत औंढा रोड वरून जिंतूर शहरात अवैध गुटखा घेऊन एक वाहन येत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. रात्री २ वाजता शहरातील औंढा ते पॉईंट वर सापळा रचून, अवैध गुटखा घेऊन येत असलेले बोलेरो पिकप क्रमांक एम. एच. ३७ टी. ०३५७ या वाहनाला अडवून तपासणी केली असता, त्यामध्ये एकूण १२ लाख ६० हजार रुपयांचा विविध कंपनीचा गुटखा आढळून




आला. याप्रकरणी नवनाथ शहाजी डोंबे वय २८ वर्षे रा. बलसा ता. जिंतूर जि. परभणी, शेख मुस्तार शेख सत्तार वय २४ वर्षे रा. बलसा रोड जिंतूर या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच सात लाखाचे बोलोरो पिकप वाहन देखील पोलिसांनी जप्त केले आहे. या प्रकारा नंतर तरी गुटखा जिंतुर पुर्णपणे नष्ट होईल का? की पुन्हा येरे माझ्या---- अशी चर्चा जिंतूरात ऐकावयास मिळत आहे.

# नागपूरहून पुण्याला जाणा-या रेल्वेगाड्यांच्या वेळेत बदल

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मध्य रेल्वे सोलापूर विभागातील दौंड आणि मनमाड विभागातील विसापूर आणि बेलवंडे स्थानकांदरम्यान मार्गाचे दुहेरीकरण सुरू करण्यासाठी प्री-नॉन-इंटरलॉकिंग आणि नॉन-इंटरलॉकिंग कामासाठी ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेणार आहे. त्यासाठी काही गाड्यांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे.
२९ ऑक्टोबर (रविवार) ते २ नोव्हेंबरपर्यंत (गुरुवार) प्री-नॉन-इंटरलॉकिंग ब्लॉक घेण्यात येईल, तर नॉन-इंटरलॉकिंग ब्लॉक २ नोव्हेंबर (गुरुवार) सायंकाळी ६ वाजतापासून ३ नोव्हेंबर (शुक्रवार) सायंकाळी ६ वाजतापर्यंत राहणार आहे.
त्यामुळे गाड्यांचे वेळापत्रक बदलण्यात येत आहे. ०२१४३ पुणे – नागपूर विशेष ही गाडी ३ नोव्हेंबरला दुपारी ४ ऐवजी सायंकाळी ६.१५ वाजता सोडण्यात येईल. २२१२३ पुणे- अजनी एक्स्प्रेस ३ नोव्हेंबरला दुपारी ३.१५ ऐवजी ४.१५ वाजता सुटणार आहे. ०१४३१ पुणे – गोरखपूर विशेष गाडी ३ नोव्हेंबरला दुपारी ४.१५ ऐवजी सायंकाळी ७.१५ वाजता सोडण्यात येईल, असे जनसंपर्क विभाग, मुख्यालय, मध्य रेल्वे, मुंबई यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

# कृषीपंपचा विद्युत पुरवठा सुरळीत करा, अन्यथा आंदोलन

## शेलुखडसे येथील त्रस्त शेतकऱ्यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** अल्पवृष्टिमुळे या वर्षीचा खरीप हंगाम हातचा गेला. सोयाबीनच्या उत्पन्नात कमालीची घट झाली.त्यामुळे शेतकऱ्यांची आता सर्व भिस्त रब्बी हंगामावरच अवलंबून आहे. आणि रब्बी हंगामात सिंचानाशिवाय पर्याय नसतो.मात्र, वारंवार खंडीत होणारा वीजपुरवठा, शॉर्टसर्किट, आणि देखभाली अभावी विद्युत रोहित्र जळने आदी कारणामुळे तालुक्यातील शेलुखडसे येथील शेतकऱ्यांना रब्बी पिकांना पाणी देणे मुश्कील झाले आहे.परिणामी शेतकऱ्यांनी वीज वितरण कंपनीचे उपविभागीय अभियंता रिसोड यांना निवेदन देऊन कृषिपंपचा वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली असून, सदर समस्येची तात्काळ दाखल न घेतल्यास वीज वितरण कंपनीच्या कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल असा इशारा शेलुखडसे येथील त्रस्त शेतकऱ्यांनी दिला आहे. रब्बी हंगामातील मुख्य पिकं असलेल्या हरभरा,गहु,कांदा, आदी पिकांची पेरणी झाली असून, खरीपातील तूर हे पीक देखील रब्बी



हंगामातच येते. त्यामुळे सर्वच पिकांना सिंचनाची नितांत गरज भासते.मात्र ऐन सिंचनाच्या हंगामातच वीज वितरण कंपनीकडून वीज पुरवठा सुरळीत होत नसल्यामुळे शेतकऱ्यांची मोठी पंचाईत होत आहे.परिणामी त्रस्त शेतकऱ्यांनी रिसोड येथील वीज वितरण कंपनीचे उपविभागीय अभियंता यांना निवेदन देऊन वीज पुरवठा सुरळीत सुरू करण्याची मागणी केली आहे.तद्वतच त्रस्त शेतकऱ्यांच्या संयमाचा बांध फुटल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. सदर निवेदनावर रिसोड तालुका काँगेस कमिटीचे अध्यक्ष राजु देवकर, काँग्रेसचे अमोल नरवाडे, शेलुखडसे येथील सामाजिक कार्यकर्ते आर.बी.खडसे, उपसरपंच नारायण खडसे, गणेश खडसे,पत्रकार अंकुश खरात, अमोल खडसे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे गोपाल खडसे, संतोष खडसे, दत्तराव खडसे, विठ्ठल खडसे, मदन खडसे, राजु खडसे, पुरुषोत्तम खडसे, आश्रुजी खडसे, वैभव खडसे, भुजंगराव खडसे, सुधाकर खडसे, नितीन खडसे, बाळू आप्पा जिरवणकर, पंडीत गंजे, विष्णू पारडे आदीसह बहुसंख्य शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पक्षाघात आल्यास गोल्डन अवर अंत्यत महत्वाचे : मेंदूविकारतज्ञ डॉ. जीवन राजपूत

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक पक्षाघात दिनानिमित्त जे.जे.प्लस हॉस्पिटल, छत्रपती संभाजी नगर येथे शनिवार, दि.२८/१०/२०२३ रोजी दुपारी २.३० वा विशेष पत्रकार परिषद संपन्न झाली.

**१) पक्षाघात म्हणजे नेमकं काय ? या आजाराचा मेंदूशी कसा संबंध येतो ?**

**उत्तर :** वैद्यकीय भाषेत या आजाराला 'सिरेब्रो व्हस्क्युलर ॲक्सीडंट' असे म्हणतात. साध्या आणि सोप्या भाषेत सांगावयाचे झाल्यास जसा हृदयविकाराचा झटका असतो, अगदी त्याचप्रमाणे मेंदूचा झटका येतो. यामध्ये मेंदूला रक्तपुरवठा करणारी रक्तवाहिनी फुटणे अथवा रक्तपुरवठा थांबणे यालाच पक्षाघात, लकवा येणे अथवा अर्धांगवायू असे म्हणतात. शरीराच्या प्रत्येक अवयवावर मेंदूचे नियंत्रण असते. त्यामुळे ज्या भागात रक्तपुरवठा थांबतो, त्या ठिकाणी पक्षाघाताचा परिणाम जाणवतो.

**२) पक्षाघाताची नेमकी लक्षणे कोणती ? ही लक्षणे कशी ओळखावीत ?**

**उत्तर :** ढोबळमानाने सांगावयाचे झाल्यास पक्षाघाताची सर्वसामान्य आणि गंभीर स्वरूपाची दोन प्रकारची लक्षणे आढळतात. ३० टक्के रुग्णांमध्ये पहिल्या प्रकारातील लक्षणे दिसून येतात. सर्वसामान्य प्रकारातील लक्षणे बहुतांश वेळा रुग्णांना लक्षातही येत नाहीत. ते रुग्ण आपोआप बरे होऊन जातात. कधीकधी पक्षाघाताची लक्षणे रुग्णांना दिसून आल्यावर ते चुकीच्या पद्धतीने उपचार घेतात. त्यामुळे जो स्वतःहून बरा होणारा आजार असतो तो गंभीर स्वरूप धारण करतो. त्यामुळे रुग्णांनी शक्यतो मेंदूविकार तज्ज्ञांकडे जाऊन उपचार घ्यावेत. अन्यथा त्याची परिणती मिरगी येणे अथवा बेशुद्ध पडण्यात होते. या आजाराबद्दल उपचारापेक्षा जनजागरूकता अधिक महत्त्वाची आणि आवश्यक आहे. वैद्यकीयदृष्ट्या पक्षाघाताची लक्षणे फास्ट नुसार ओळखावीत जसे तोंड वाकडे होणे, हाताला कमजोरी येणे, बोलताना अडथळा निर्माण होणे, ही सर्व लक्षणे किती वेळा, किती वाजता आढळून आली, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**३) पक्षाघात होण्यासाठी कोणती कारणे असू शकतात ?**

**उत्तर :** प्रामुख्याने पक्षाघात होण्यासाठी रक्तवाहिनी ब्लॉक होणे अथवा फुटणे ही दोन कारणे आहेत. त्याचसाठी हृदयविकार, धमन्या कठोर होणे, अनियंत्रित मधुमेह, बदललेली जीवनशैली, उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्टेरॉल, धूम्रपान, मेंदूला रक्त पुरवठा करणाऱ्या धमनीचा विकार आदी कारणीभूत असतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर पक्षाघात हा प्रत्येक सहा व्यक्तींमागे एका व्यक्तीला होतो.

**४) पक्षाघात रुग्णांना गोल्डन अवर कोणते असतात ?**

**उत्तर :** शास्त्रीयदृष्ट्या पक्षाघात रुग्णांसाठी ३ तास ४० मिनिटे ही गोल्डन अवर मानली जातात. यादरम्यान रुग्ण मेंदूविकार तज्ज्ञांकडे उपचारासाठी आल्यास योग्य उपचार पद्धतीने तो बरा होऊ शकतो. आतापर्यंत नैसर्गिकरीत्या अर्थात रक्तवाहिनी ब्लॉक होण्याची प्रक्रिया वयाच्या पन्नाशीनंतर सुरू होत असायची. आता बदललेल्या जीवनशैली मुळे अगदी वयाच्या पस्तिशीत पक्षाघाताचा धोका वाढलेला आहे.

**५) पक्षाघाताची आधुनिक उपचारपद्धती कोणती ?**

**उत्तर :** १) शस्त्रक्रिया : दुर्बिणीद्वारे रक्ताची गाठ काढणे, डोक्याची कवटी काढून पोटात ठेवणे, नवीन रक्तवाहिनी जोडणे. २) स्टेट व कॉईल वापरून रक्तस्राव थांबवणें. ३) रक्तवाहिनीतील रक्ताची गाठ दुर्बिणीद्वारे काढणे. ४) गोल्डन अवरपर्यंत आल्यास रक्ताची गाठ इंजेक्शनद्वारे वितळवणे

**६) पक्षाघाता संदर्भात केले जाणारे उपचार हे महागडे असतात हे खरे आहे का ?**

**उत्तर :** गोल्डन अवरमध्ये रुग्ण तज्ज्ञांकडे उपचारासाठी गेल्यास रुग्ण कमी खर्चात बरा होऊ शकतो. मात्र, त्यानंतर आधुनिक उपचार करण्यासाठी खर्च लागतो. चुकीच्या ठिकाणी उपचार घेतल्यास खर्च तर वाया जातो; मात्र आजार बरा न होता केवळ निराशा पदरी पडते. उपचारासाठी लागणारे तंत्रज्ञान, यंत्रे, व्यवस्थापन आणि इतर वैद्यकीय खर्च वाढल्याचा परिणाम खर्चावर निश्चित होतो. त्याचबरोबर काही शासकीय योजनांचा लाभ घेतल्यास आर्थिक मदत होते.




**७) पक्षाघाता संदर्भात समाजात असंख्य गैरसमज पसरलेले आहेत. त्याविषयी काय सांगाल ?**

**उत्तर :** प्रामुख्याने ग्रामीण भागामध्ये स्वयंघोषित डॉक्टर आणि वैद्यांचा सुळसुळाट झालेला आहे. रुग्ण गोल्डन अवरमध्ये मेंदूविकारतज्ज्ञांकडे जाण्याऐवजी भोंदू डॉक्टरकडे जाण्याला प्राधान्य देतात. अशावेळी सर्वसामान्य पातळीवर असलेला आजार गंभीर स्वरूपात परावर्तित होऊ शकतो. मुळात ३० टक्के रुग्णांचा आजार हा आपोआपच बरा होत असल्याने भोंदू तथा स्वयंघोषित डॉक्टरांचे फावते. त्यामुळे मालिश करणे, तेल लावणे, अघोरी उपचार करण आणि बळी देणे टाळावे.

**८) पक्षाघात टाळता येऊ शकतो का ?**

**उत्तर :** होय, नक्कीच या शक्यतांबाबत तुमच्या फॅमिली डॉक्टरशी बोला (वरील शक्यता पाहा) आणि तुम्ही कशा प्रकारे धोका टाळू शकता पाहा. तुमचा धोका टाळण्यासाठी तुम्ही करू शकत असलेले काही उपाय येथे दिले आहेत. तुम्हाला उच्च रक्तदाब असल्यास, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्याचे नियंत्रण करा फॅट आणि कोलेस्ट्रॉलयुक्त पदार्थ खाणे टाळा आणि फॅट आणि कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठ मीठ खाण्याचे प्रमाण कमी करा. तुम्हाला मधमेह असल्यास रक्तशर्करा पातळी नियंत्रित ठेवा, मद्यपानाचे प्रमाण कमी करा, धूम्रपान करणे सोडून द्या, करीत नसाल तर सुरु करू नका, पक्षाघात टाळण्यासाठी नियमित वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे.. ॲस्पिरीनचे लहान डोस तुमचा पक्षाघाता बाबतचा धोका कमी करू शकतात का, याबाबत तुमच्या डॉक्टरांना विचारा. ॲस्पिरीन तुमच्या रक्तामध्ये गाठी पडु देत नाही आणि यामुळे तुमच्या धमन्यांमध्ये अडथळा निर्माण होत नाही.

**९) पक्षाघाताचा झटका येत आहे, हे ओळखता येऊ शकते का ?**

**उत्तर :** होय, चेहरा, हात किंवा पाय अचानक सुन्न किंवा कमकुवत होणे. दृष्टीमध्ये आकस्मिक अंधूकपणा किंवा दिसने बंद होणे, विशेषतः एका डोळ्याने दुसरे काय बोलत आहेत ते न समजने किंवा बोलायला त्रास होणे. कोणतेही कारण नसतान अचानक डोके भयंकर दुखू लागणे, चक्कर येणे अस्थिर चाल किंवा पडणे. विशेषतः इतर लक्षणांसह स्ट्रोकचे आणखी एक वॉर्निंग लक्षण म्हणजे ट्रान्जियंट इस्केमिक ॲटक याचा अर्थ म्हणजे लहान पक्षाघात ज्यामध्ये वरील लक्षणे अगदी शेवटच्या मिनिटांमध्ये दिसू शकतात आणि त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे महागात पडू शकते. असलेल्या लोकांना कालांतराने पक्षाघाताचा झटका येण्याची शक्यत असते. जर ची लक्षणे तुमच्यात आढळून आलं तर ताबडतोब तुमच्या डॉक्टरांशी संपर्क साधा.

**(१०) न्यूरोटीम या नात्याने तुम्ही रुग्णांना काय सल्ला द्याल ?**

**उत्तर :** न्यूरोटीम या नात्याने मला सांगावेसे वाटते की मेंदू संबंधित कोणताही आजार ह इमर्जन्सी प्रकारात येतो. त्यामुळे जितक्या लवकर २४ तास उपलब्ध असलेल्या न्युरोसर्जन व टीमकडे उपचारासाठी जाता येईल तितके चांगले. कोणत्याही आजाराचा गोल्डन अवर हा वाया जाता कामा नये त्यामुळे तुमची शारीरिक, मानसिक आणि आर्थिक हानी लकवर भरून निघू शकत नाही. बऱ्याच ठिकाणी इमर्जन्सी सेवा उपलब्ध असतात त्याच लाभ घ्यावा. पक्षाघात संदर्भात योग्य मार्गदर्शन उपचार अत्यावश्यक असतात.

# ब्लॅक बेल्ट कराटे स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** महाराणा तायक्वांदो कराटे अकॅडमी परतूरच्या चार विद्यार्थ्यांची निवड चंचल वासुदेव दाते, पवन सुरेश जाधव, जगजीत सिंग बलजीत सिंग जुनी, सोहम संतोष जाधव, या चार विद्यार्थ्यांची ब्लॅक बेल्ट कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मनस्वी दुष्यंत इगारे या विद्यार्थिनीची कलर बेल्ट साठी निवड झाली आहे. दि. 29 नोव्हेंबर ते 1 डिसेंबर दरम्यान मुंबई येथे होणार आहेत या विद्यार्थ्यांनी तीन ते चार वर्ष मेहनत करून मास्टरच्या डिग्री पर्यंत मजल मारली आहे. या विद्यार्थ्यांची सर्व स्तरावरून कौतुक करण्यात येत आहे. यावरील पाच विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडील शाळेचे प्रशिक्षकाचे तालुक्याचे जिल्ह्याचे महाराष्ट्राचे नाव रोशन केले आहे. वरील विद्यार्थ्यांनी सकाळ संध्याकाळ दोन्ही टाईममध्ये क्लास करून ब्लॅक बेल्ट व कलर बेल्ट साठी मजल मारली आहे. मनस्वी घारे या विद्यार्थिनीची कलर साठी निवड झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल मुख्य प्रशिक्षक संतोष सखाराम जाधव माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया साहेब पोलीस निरीक्षक सुरवसे साहेब, काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रवीण डुकरे कराटे प्रशिक्षक अहाद शेख, अनिल भीमराव राठोड, दुष्यंत इगारे, अभय कुमार साळुंके सर आदींनी अभिनंदन केले आहे.



# पिशोर गावात मराठा समाज बांधवांणी मुंडन करून काढली सरकार विरोधात अंतयात्रा...!

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील पिशोर येथे रविवार सकाळी सरकारच्या विरोधात सकल मराठा समाजाच्या वतीने मुंडन करून गावातून अंतयात्रा करून विश्वास घाती सरकार चा करायचा काय खाली मुंडका वर पाय' एक मराठा लाख मराठा आश्या घोषणा देता निषेध व्यक्त करण्यात आला.

राज्यात मराठा समाजाला हक्काचे आरक्षण मिळेपर्यंत आंदोलन सुरु ठेवण्याचा निर्धार समाजाने केला आहे. जोपर्यंत आरक्षण मिळत नाही तोपर्यंत आमरण उपोषण करणार असा निर्धार करीत आंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी मराठा समाजाने राज्यभरात गावोगावी उपोषण, साखळी उपोषण आंदोलन सुरु केले आहे. कन्नड तालुक्यातील पिशोर व परिसरातील मराठा समाज आक्रमक झाला असून तालुक्यातील अनेक गावांत राजकीय पुढाऱ्यांना गावबंदी केली आहे. गावबंदी अशी फलके गावांच्या प्रवेशद्वारावरच झळकत आहेत. तसेच रविवारी सकाळी सरकारच्या विरोधात मुंडन करून अंतयात्रा करून सभेचे आयोजन करण्यात आले होते. 32 वर्ष पासून मराठा समाजाचा आरक्षण अड्कुन ठेवणाऱ्याचा विजय असो एक मराठा लाख मराठा अश्या घोषणा देत सम सभेचे आयोजन करण्यात आले होते मराठा समाजाचा आरक्षण नाचा मुद्दा गंभीरयाने घेणे गरजेचे आहे, आम्ही हिन्दू मुस्लिम बांधव भाईचार्या सोबत राहतो एक मेकाच्या सुखा दुखांत सन्मानाने उभे राहतो,तसेच आम्ही एकाच खोलीत एकाच शाळेत शिकलो मात्र परिस्थिति मुळे अभ्यासाला गति मिळाली नाही, मात्र माझ्या सोबत चे वर्ग मित्र त्यांच्या मुलांनी उच्च शिक्षण घेऊन ही दर दर भटकत फिरावे लागत आहे, शिक्षनाची मोठी मेहनत घेऊन ही काहीच फायदा होत नसल्याणे अनेक विद्यार्थी टोकेचे पाउल उचलतात, गुणवत्ता" असून नौकरी नाही "क्षमता" असून शिक्षण नाही, मराठा आरक्षण साठि प्रतेक गावात आंदोलन उपोषण सुरु आहे माय बाप सरकार ने आरक्षण देण्याची अत्यंत गरज आहे अशे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते एजाज (गौसु) पठाण यांनी केले या सूत्रसंचालन प्रा. संजय गायकवाड यांनी केले होते.

# लहान मुलांवरील शस्त्रक्रियांचा होणार अभ्यास

## बालरोग शल्यक्रिया तज्ज्ञांची राष्ट्रीय परिषद

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** बालरोग शल्यक्रिया संदर्भातील राष्ट्रीय आंतराष्ट्रीय तज्ज्ञांना एकत्र आणून त्यांच्या ज्ञानाची आदानप्रदान व्हावी, मराठवाड्यातील डॉक्टरांनाही त्याचा लाभ व्हावा यासाठी इंडियन असोसिएशन ऑफ पेडीयाट्रिक्स सर्जन कॉन्फरन्स (आयएपीएस) अर्थात बालरोगशल्यचिकित्सक आणि बालरोग मूत्रमार्ग शल्यचिकित्सकांची (पेडियाट्रिक सर्जन्स) राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे.अतिशय अवघड वैद्यकीय शाखा असलेल्या या विषयाचा अभ्यास आणि या क्षेत्रातील वरिष्ठ तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन यावेळी मिळणार असल्याने पेडियाट्रिक सर्जनसबरोबरच बालरोग तज्ज्ञ, पदव्युत्तरच्या विद्यार्थ्यांसाठी ही परिषद ज्ञानार्जनाच्या दृष्टीने महत्वाची ठरणार आहे.

परिषदेविषयी माहिती देण्यासाठी आज पत्रकार परिषदेचे आयोजन छत्रपती संभाजीनगर पेडियाट्रिक सर्जन्स असोसिएशनच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी संघटनेचे अध्यक्ष डॉ. भागवत कराड यांनी परिषदेच्या संदर्भात विस्तृत माहिती दिली. बालरोगतज्ञ शल्यचिकित्सा ही शाखा दिवसेंदिवस विकसित होत आहे. जनसामान्यात बालरोग शल्यक्रिया संबंधीची माहिती, या क्षेत्रात नव्याने येणारे तंत्रज्ञान, बालशल्यचिकित्सकाव्दारे उपचार करण्याचे फायदे, याची माहिती डॉक्टरांना व्हावी हा या उद्देशाने दि.२ ते ५ नोव्हेंबरच्या दरम्यान करण्यात राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली असल्याची माहिती संयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. भागवत कराड यांनी सांगितले. लॅप्रोस्कोपी, रोबोटीक्स, आर्टिफिशीयल इंटीलीजन्स अर्थात कृत्रिम बुध्दिमत्तेचा वापर शल्यचिकित्सेच्या क्षेत्रात वाढत आहे. बालरोगशल्यचिकित्सा क्षेत्रातही या आधुनिक पध्दतींचा वापर वाढला आहे. गर्भातील बालकावरील शस्त्रक्रियांबरोबरच अत्याधुनिक तंत्रज्ञान समोर येत आहे. हे ज्ञान प्रत्येक डॉक्टरांपर्यंत पोहचवायचे असेल तर परिषदांची आवश्यकता असते. त्यामुळेच मराठवाड्याची राजधानी आणि ऐतिहासिक छत्रपती संभाजीनगर मध्ये करण्यात आली आहे असे संयोजन समितीचे सचिव डॉ. आर.जे.तोतला यांनी सांगितले. ही ४९ परिषद आहे आणि औरंगाबादला पहिल्यांदाच परिषद भरवण्याचा मान मिळाला आहे. प्रत्यक्ष शस्त्रक्रियांचा अनुभव, बालशल्यचिकित्सकेतील आधुनिक तंत्र, ज्ञान याबरोबरच १०० च्यावर संशोधन निबंध, पोस्टर,चर्चासत्रे अशी ज्ञानाची भरगच्च मेजवानी पाच दिवसांच्या परिषदेच्या दरम्यान मिळणार आहेत. 400 प्रतिनिधींनी परिषदेसाठी नोंदणी केली आहे. सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, अबुधाबी, नेपाळ, अमेरिका येथून सुमारे २० तज्ज्ञ परिषदेत प्रत्यक्ष सहभागी होणार आहेत तर कॅलिफोर्निया, जर्मनी आणि पोलंड येथील तज्ज्ञ ऑनलाईन या परिषदेत सहभागी होणार आहेत.

२ नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष शस्त्रक्रियांनी परिषदेस सुरुवात होईल.३,४,५ हे तीन दिवस विविध चर्चासत्रे, पेपर प्रेझेंटेशन होईल असे डॉ. राजगोपाल तोतला यांनी यावेळी सांगितले. परिषदेचे उद्घाटन ३ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजता केंद्रिय अर्थराज्यमंत्री आणि छत्रपती संभाजीनगर संघटनेचे अध्यक्ष डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते होणार आहे. पत्रकार परिषदेत संयोजन समितीचे डॉ. रमेश बजाज, डॉ. सय्यद कैसरोददीन डॉ.मुक्तदिर अन्सारी, डॉ. विद्यानंद देशपांडे, डॉ. पिनाकीन पुजारी, , डॉ. रामदास नागरगोजे, डॉ. प्रदीप राठोड, डॉ. संदिप हंबरडे, डॉ, अर्जुन पवार, यांची उपस्थिती होती.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# खेळणाऱ्या मुलांचे करिअर उज्ज्वल होते : डॉ. कराड

## पालकांमधील गैरसमज दूर करण्याची आवश्यकता; पहिल्या महिला लीगमध्ये १९० खेळाडूंचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आपली मुले एखादा खेळ खेळायला लागली तर, त्यांचे करिअर खराब होईल. ते अभ्यासाकडे दुर्लक्ष करतील, असा गैरसमज पालकांनी दुर करावा. खेळणाऱ्या मुलाचे करिअर खराब होत नाही तर उज्ज्वल होते. त्यांच्यासाठी अनेक पर्याय व संधी उपलब्ध असल्याचे प्रतिपादन केंद्रीय अर्थराज्य मंत्री भागवत कराड यांनी केले. ते भारतीय क्रीडा प्राधिकारणाच्या (साई) वतीने आयोजित खेलो इंडिया पहिल्या महिला लीग ज्युदो स्पर्धेचे उद्‌घाटन डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. एन ३ ज्युदो प्रशिक्षण केंद्र येथे झालेल्या स्पर्धेत १९० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. यावेळी साईचे सहायक संचालक सचिन वायाळ, सहसंचालक सुमेध तरोडेकर, जिल्हा संघटनेचे अध्यक्ष अजित मुळे, साईचे योगेश धाडवे, एईव्हीपीएम महाविद्यालयाच्या डॉ. केजल भारसाखळे, मनोज बोरा, डॉ. अजय दंडे, जिल्हा उपाध्यक्ष भिमाशंकर नावंदे, सचिव अतुल बामनोदकर, डीएसओ बाजीराव देसाई, डॉ. गणेश शेटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

**नोव्हेंबरच्या शेवटी खासदार चषक होणार :**

मुलांनी आव्हान स्विकारण्याचे शिकायला हवे. पराभवातून शिकायला मिळते, त्याकडे एक प्रकारची पुन्हा मिळालेली संधी म्हणून पहा. मैदानातच नव्हे तर जिवनात यशस्वी होताल. येत्या नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात खासदार चषक क्रीडा स्पर्धा आयोजन करण्याच्या दृष्टीने तयारी सुरू असल्याचे डॉ. कराड यांनी म्हटले.

**नव्या क्रीडा धोरणाचा फायदा :**

सध्या नव्या क्रीडा धोरणाचा खेळाडूंना फायदा होताना दिसतोय. एशियाड व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळाडूंची कामगिरी उंचावली आहे. पदकाची संख्याही वाढली आहे. स्थानिक खेळाडूपर्यंत क्रीडा योजनांचा पोहोचत आहे. अशाच प्रकारच्या स्पर्धेतून सरकारने खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करुन द्यावे, असे संघटनेचे अध्यक्ष अजित मुळे यांनी म्हटले. त्यांनी म्हटले की, देशात एकमेव छत्रपती संभाजीनगरची ज्युदो संघटना अशी आहे, ज्यांचा स्वतःचा हॉल आहे. येथे आताही अनेक सुविधा हव्या आहेत. त्यावर डॉ. कराड यांनी संघटनेच्या



जागेच्या विकासासाठी, सोयीसुविधा देण्यासाठी निश्चित मदत करु, असे आश्वासन अजित मुळे यांना दिले.

**सौदर्या, सिमा, गौरीला सुवर्णपदक**

स्पर्धेत कनिष्ठ गटात २१ किलो गटात सौदर्या सोनुनेने सुवर्ण, तर गौरी सुरवसेने रौप्यपदक जिंकले. २८ किलो गटात शेख सिमाने सय्यदा आऐशाला हरवत सुवर्ण मिळवले. आऐशाने रौप्य व निशा वाघने कांस्यपदक राखले. ३२ किलो गटात गौरी गायकवाडने सोनेरी कामगिरी केली. तेजस्विनी गावडेने रौप्य, इफरा शेख व मयुरी चव्हाणने कांस्यपदक आपल्या नावे केले.



# मुद्देमालासहित लाखोंचा पानमसाला जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपूर तालुका पोलीस स्टेशनचे जयेश खलाणे यांनी मोठी कामगिरी केली आहे सेंधवा कडून येणारा पानमसा भरलेला ट्रक सहित ८१ लाख ७७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सहायक पोलीस निरिक्षक जयेश खलाणे यांना गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, सेंधवाकडून एक ट्रकमध्ये प्रतिबंधीत असलेली सुंगधीत तंबाखु व पानमसाला भरुन धुळे कडे येत आहे अशी बातमी मिळाल्यावरुन सपोनि जयेश खलाणे यांनी रात्रगस्त वरील विजय पाटील, दिनकर पवार, सुनिल पवार, योगेश मोरे,संतोष पाटील, चालक अलताफ मिर्झा यांना आदेशित करुन सदर वाहन हे हाडाखेड चेकपोस्ट जवळ मुंबई आग्रा रोडवर रात्री 02.30 वाजेच्या सुमारास पकडुन त्यावरील चालकास त्याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव सुरेश एन वेलुथिरा वय 31 वर्षे, व्यवसाय चालक व क्लिनर, रा. नॅथरापुझा, पुलक्कलकडवु, पुल्लसेरी, करकुरीस्सी, पुल्लीसेरी, पल्लकड, केरल असे सांगुन त्यास वाहनात काय आहे बाबत विचारले असता त्याने वाहनात मैदा व रवा असल्याचे सांगितले. परंतु सदर वाहनात सुगंधीत तंबाखु व पानमसाला असल्याचा संशय आल्याने सदर वाहनाची ताडपत्री उघडुन बघितले असता मैदा व रवाच्या गोण्यांखाली सुगंधीत तंबाखु व पानमसाला आढळुन आल्याने पोलीस ठाण्यात दोन पंचांसमक्ष पंचनामा करुन त्यात खालील प्रमाणे महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला पानमसाला व सुगंधीत तंबाखू मिळुन आली ती 1) 51,77,190/- रुपये किंमतीचा शिखर पानमसाला, गणेश सुगंधीत तंबाखु, व कुल लिप नावाची सुगंधीत तंबाखू . 2) 30,00,000/- रुपये किंमतीची एक भारतबेंझ कंपनीची 3523 मॉडेल असलेली 12 चाकी ट्राला असलेला निळसर रंगाचा ट्रक एकूण- 81,77, 190/- रुपये किंमतीचा माल वाहनासह विक्रीसाठी वाहतुक करताना मिळुन आल्याने सदर मुद्देमाल व वाहन जप्त करण्यात आले आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक संजय बारकुंड अपर पोलीस अधीक्षक श्री किशोर काळे सचिन हिरे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरपुर यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपुर तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी सहायक पोलीस निरिक्षक श्री जयेश खलाने, पोलीस उप निरिक्षक श्री विजय पाटील, संजय भोई, दिनकर पवार, सुनिल पवार, योगेश मोरे, संतोष पाटील, चालक अलताफ मिर्झा यांनी केलेली असुन सदर कारवाई बाबत अन्न सुरक्षा अधिकारी किशोर हिंमतराव बाविस्कर यांनी फिर्याद दिल्यावरुन नमुद चालकाविरुध्द शिरपुर तालुका पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# १ वर्षात ४१५० तक्रारींचे निवारण

## चांदा सिटी हेल्पलाईन ॲपला उत्तम प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महानगरपालिकेतर्फे मागील वर्षी करण्यात आलेल्या चांदा सिटी हेल्पलाईन ॲप तक्रार निवारण कार्यप्रणालीस उत्तम प्रतिसाद मिळाला असुन सदर ॲपवर आतापर्यंत विविध विषयांच्या ४१७२ तक्रारी प्राप्त झाल्या असुन यापैकी ४१५० तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे.

चंद्रपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक विपीन पालीवाल यांनी पालिकेची सुत्रे हाती घेतल्यापासुन मनपाद्वारे देण्यात येणाऱ्या सेवा लोकभिमुख होण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. यापुर्वी नागरीकांच्या तक्रारी या पत्र स्वरूपात किंवा लोकप्रतिनिधींच्या माध्यमातुन प्रशासनास प्राप्त व्हायच्या व त्याचे निराकरण व्हावयास ही वेळ लागायचा. मात्र प्रशासनाचे कामकाज गतिमान व्हावे या दृष्टीने आयुक्तांच्या संकल्पनेतुन २५ ऑक्टोबर रोजी चांदा सिटी हेल्पलाईन ॲपची सुरवात करण्यात आली होती.

या कार्यप्रणालीनुसार इंटरनेटच्या गुगल प्ले स्टोअरमधून चांदा सिटी हेल्पलाईन हे ॲप डाउनलोड केल्यानंतर किंवा टोल फ्री क्रमांक १८००-१२३-७९८० येथे संपर्क करून व ८५३०००६०६३ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर तक्रार करता येते. तक्रारीत संबंधित परिसर, विभाग, तक्रार पाठवणाऱ्याचे नाव, मोबाइल नंबर, पत्ता, तक्रारीचे स्वरूप लिहून पाठवावे लागते. याच तक्रारीत गरज भासल्यास संबंधित तक्रारीचा फोटोही अपलोड करता येतो. चांदा सिटी हेल्पलाईन ॲपचे नाव व संपर्क क्रमांकांची प्रसिद्धी एसएमएस,फोन कॉल, ऑटो मायकिंग, सोशल मीडिया व इतर प्रसिद्धीमाध्यमांद्वारे मोठ्या प्रमाणात करून ज्यास्तीत ज्यास्त नागरीकांपर्यंत हे क्रमांक पोचविण्यात आले आहे.

या ॲपवर स्वच्छता,समाज कल्याण -दिव्यांग,महिला व बालकल्याण,रमाई आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना,NULM, विद्युत व दिवाबत्ती, रेन वॉटर हार्वेस्टिंग, मोकाट जनावरे, बांधकाम,नगर रचना बिल्डींग परवाना, पाणी पुरवठा, कर, उद्यान, अवैध बांधकाम, अमृत योजना, अवैध होर्डिंग, अतिक्रमण, अग्निशमन व इतर नागरी सुविधांच्या दृष्टीने नागरीकांना तक्रार करता येते. तक्रार प्राप्त झाल्यानंतर ४८ तासांच्या आता निराकरण करण्याची जबाबदारी संबंधित विभागीय अधिकारी व संबंधित विभागप्रमुख यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

अधिकारी स्तरावर तक्रार निश्चित दिवसात मार्गी लागली नाही तर हीच तक्रार पुढे टप्प्याटप्प्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वर्ग होते. तक्रारींचे निराकरण कितपत झाले किंवा पेंडंसी आहे का ? याचा आढावा आयुक्तांद्वारे नियमित घेतला जात असल्याने संबंधित तक्रारी त्वरेने निकाली काढल्या जात आहेत.मनपाद्वारे देण्यात येणाऱ्या नागरी सुविधांबाबत कुठलीही तक्रार असल्यास चांदा सिटी हेल्पलाईन ॲपचा वापर करण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर